सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

वर्ष - ३ रे | अंक - १४७ वा | अमरावती (महाराष्ट्र) | शुक्रवार दि. ४ जुलै २०२५ | संपादक - शुभांगी जोशी | मुल्य - १ रु. | पृष्ठ -६

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंकडून पुण्यात 'जय महाराष्ट्र' पाठोपाठ 'जय गुजरात'चा नारा

### आता...जय गुजरातची चर्चा सुरु होणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४पुणे**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून पुण्यात जय गुजरातची घोषणा करण्यात आली आहे. यामुळे आधीच मराठी आणि हिंदीवरून वाद सुरु असताना आता शिंदे यांच्या जय गुजरातची चर्चा सुरु होणार आहे.

केंद्रीय मंत्री अमित शाह आज पुण्याच्या दौऱ्यावर आहेत. यावेळी जयराज स्पोर्ट्स् आणि कन्व्हेंशन सेंटरच्या उद्घाटन कार्यक्रमात शिंदे यांनी भाषण केले. यावेळी भाषण संपतानाच शिंदे यांनी धन्यवाद, जय महाराष्ट्र म्हटले आणि निघत होते. तेव्हा खाली वाचून त्यांनी पुन्हा जय गुजरात असा नारा दिला. यावरून आता वाद सुरु होण्याची शक्यता आहे.



गुजराती समाजाकडून पुण्यातील कोंढवा भागात हे सेंटर उभारण्यात आले आहे. शिंदे यांनी अमित शाह यांच्या उपस्थितीत हा नारा दिला आहे.

अमित शाह यांच्यासाठी शिंदे यांनी एक शेर ऐकविला. ''आपके बुलंद इरादोंसे तो चट्टाने भी डगमगाती है, दुश्मन क्या चीज है, तुफान भी अपना रुख बदल देता है, आपके आने से यहाँ की हवा का रुख बदल जाता है, आपके आनेसे हर शख्स आदब से झुक जाता है'', असा हा शेर शिंदे यांनी ऐकवला. याचेही राजकीय संदर्भ जोडले जात आहेत.एकनाथ शिंदे यांनी यावेळी २०२२ च्या सत्ताबदलाची पुन्हा एकदा आठवण करून दिली. ते म्हणाले, अमित शाहांच्या रणनीती आणि नेतृत्वामुळे अशक्य ते शक्य करून दाखवले आहे. त्यांनी आव्हानांना संधीत बदलले आहे. त्यांच्या या कार्यक्षमतेचा मी स्वतः अनुभव घेतला आहे. त्यावेळी राज्यात सामान्य माणसाचे सरकार आणणे गरजेचे होते. त्यावेळी पंतप्रधान मोदींचे मार्गदर्शन होतेच. पण अमित शाह माझ्यामागे पर्वतासारखे ठामपणे उभे होते.

## ठाकरे बंधूंच्या विजयी मेळाव्याकडे प्रकाश आंबेडकरांची पाठ

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मुंबई**

त्रिभाषा धोरणातील हिंदी सक्तीला विरोध करण्यासाठी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे एकत्र येणार होते. मात्र, त्याआधीच राज्य सरकारने हा निर्णय मागे घेतला. त्यामुळे ठाकरे बंधू एकत्र येणार का, यावर चर्चांना उधाण आले होते. हिंदी सक्तीविरोधातील निर्णय शासनाने मागे घेतल्यानंतर आता उद्धव ठाकरेंची शिवसेना आणि राज ठाकरेंच्या मनसेकडून ५ जुलै रोजी 'विजयी मेळावा' आयोजित करण्यात आला आहे. हा मेळावा वरळी येथे होणार आहे. या मेळाव्यासाठी सर्वपक्षीयांनी उपस्थित राहण्याचे आवाहन राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी केले आहे. मात्र,



आता वंचित बहुजन आघाडी या विजयी मेळाव्याला अनुपस्थित राहणार असल्याची माहिती समोर येत आहे. तर काँग्रेसमध्ये देखील ऐनवेळी नाराजी पसरल्याची माहिती समोर आली आहे.

वंचित बहुजन आघाडी ठाकरे बंधूंच्या मेळाव्याला अनुपस्थित राहणार आहे. या मेळाव्याला प्रकाश आंबेडकर किंवा वंचित बहुजन आघाडीचा कोणताही प्रतिनिधी उपस्थित राहणार नाही, अशी स्पष्टोक्ती प्रकाश आंबेडकरांनी 'एबीपी माझा'शी बोलताना दिली आहे. आमचा उद्याच्या मेळाव्याची काहीही संबंध नसल्याचे त्यांनी सांगितले आहे. त्यामुळे प्रकाश आंबेडकर यांची उद्धव ठाकरेंसोबतची 'शिवशक्ती-भीमशक्ती' युती तुटल्यानंतर अजूनही उद्धव ठाकरेंवर नाराज असल्याचे संकेत मिळत आहे. लोकसभा निवडणुकीपूर्वी दोन्ही पक्षांनी युती तुटल्याचे घोषणा केली होती. आता काँग्रेस आणि प्रकाश आंबेडकर यांचा वंचित बहुजन आघाडी पक्ष ठाकरेंच्या विजयी जल्लोषाला अनुपस्थित राहणार असल्याने आता या मेळाव्याला कोणकोणत्या पक्षाचे नेते उपस्थित राहतात? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## इंग्रजांनी व काही स्वकीयांनी आमच्या अनेक नायकांवर अन्याय केला

### देवेंद्र फडणवीसांचं पुण्यात विधान

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४पुणे**

पुण्यातील एनडीए येथे थोरले बाजीराव पेशवे यांच्या अश्वारूढ पुतळ्याचं अनावरण आज आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात करण्यात आलं. यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठ्यांचा इतिहास लोकांपर्यंत अपुराच पोहचण्यासाठी इंग्रज व काही स्वकीयांना दोष दिला. त्यामुळे मोगलांनंतर आपल्याकडे थेट इंग्रजच आहले, असं आपल्याला वाटलं, असंही फडणवीस यावेळी आपल्या भाषणात म्हणाले. यावेळी त्यांनी थोरल्या बाजीराव पेशव्यांच्या युद्धनीतीचे काही दाखले दिले.



एनडीएमधील कार्यक्रमात अमित शाह यांच्या हस्ते या पुतळ्याचं अनावरण करण्यात आलं. यावेळी अमित शाह यांच्यासमवेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आदी मान्यवर उपस्थित होतं.थोरल्या बाजीराव पेशव्यांसाठी वेग ही सर्वात मोठी रणनीती होती, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. थोरले बाजीराव पेशवे यांच्या लढाईत वेग ही सर्वात मोठी रणनीती असायची. जेव्हा मुघल साम्राज्याची सेना एका दिवसात आठ ते दहा किलोमीटर प्रवास करायची, तेव्हा थोरल्या बाजीरावांनी अशी सेना तयार केली होती की जी एका दिवसात ६० ते ८० किलोमीटर प्रवास करू शकायची. त्यांचं हे युद्ध कौशल्य होतं, असं फडणवीस म्हणाले.

## कंत्राटे, टेंडर्सच्या मागे लागू नका; मतदारसंघाच्या हिताचा विचार करा

### भाजप आमदारांना मुख्यमंत्र्यांनी दिला सल्ला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मुंबई**

कॉन्ट्रॅक्ट, टेंडरच्या मागे लागू नका, मतदारसंघाच्या व्यापक हिताचा विचार करून कामे करा. आपल्या पक्षाचा संस्कार वेगळा आहे, त्यानुसार पुढे जा असा सल्ला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाजपच्या आमदारांना दिला आहे.

फडणवीस यांनी भाजप आमदारांना बुधवारी रात्री वर्षा बंगल्यावर स्नेहभोजन दिले. यावेळी त्यांनी आमदारांना मार्गदर्शन केले. विकासाची कामे करताना मतदारसंघाचे कशात भले आहे, त्याचा विचार करूनच कामे केली पाहिजेत. आमदार निधीचा योग्य वापर करा. राज्यासमोर आर्थिक अडचणी काही महिने नक्कीच आहेत पण त्याचा फटका विकासकामांना बसणार नाही याची काळजी घेतली जाईल, असे मुख्यमंत्री म्हणाल्याचे सूत्रांनी सांगितले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आपल्याला जिंकायच्याच आहेत. बहुतेक ठिकाणी महायुती होईल. अपवादात्मक परिस्थितीत अडचणी येतील, त्या सोडविण्याचा प्रयत्न असेल. तुम्ही मात्र महायुती म्हणूनच आपण निवडणुकांना सामोरे जाणार आहोत हे गृहित धरून कामाला लागा, असेही ते म्हणाल्याचे कळते.



**'सोशल मीडियावर व्यक्त व्हा'**

केंद्र आणि राज्य सरकारचे निर्णय, भाजपची कामगिरी लोकांपर्यंत कशी पोहोचेल यासाठी सोशल मीडियाचा अत्यंत प्रभावीपणे उपयोग करा असा सल्ला देताना त्यांनी स्वत:सह चंद्रशेखर बावनकुळे, आशिष शेलार, रवींद्र चव्हाण यांची उदाहरणे दिली. कोणकोणते आमदार सोशल मीडियाच्या विविध प्लॅटफॉर्मचा किती वापर करतात याचा चार्ट आमदारांना दाखविला.

**नरेटिव्ह तयार करा**

लोकसभा निवडणुकीत विरोधकांच्या फेक नरेटिव्हचा फटका बसला होता. विधानसभेत आपण आक्रमक होऊन ते हाणून पाडले. यावेळी पुन्हा आपल्याविरोधात फेक नरेटिव्ह तयार करण्याचे चालले आहे. त्याला जोरदार प्रत्युत्तर प्रत्येक आमदाराने दिले पाहिजे. त्यांनी फेक नरेटिव्ह तयार करायच्या आधीच सरकारच्या, पक्षाच्या बाजूने नरेटिव्ह आपल्याला तयार करता आले पाहिजेत, असे मुख्यमंत्री म्हणाले.

**'याला-त्याला घेऊ नका, अशी भूमिका नको'**

भाजपमध्ये बाहेरच्या पक्षातील लोक मोठ्या प्रमाणात येत आहेत. पक्ष मजबूत होण्याच्या दृष्टीने त्याचा फायदाच होणार आहे. त्याला विरोध करण्याची भूमिका घेऊ नका. मतदारसंघासाठी तुमचा आणि पक्षसंघटनेचा शब्दच अंतिम असेल.

जे बाहेरून येत आहेत ते सहकार्य करतील याची काळजी आम्ही घेऊ, नाशिक आणि अन्य काही ठिकाणी इतर पक्षातून नेत्यांना घेण्यास विरोध करण्यात आला होता ही पार्श्वभूमी मुख्यमंत्र्यांच्या या विधानामागे होती.

## बुडाखालून गेल्या खुर्च्या म्हणून काढतायत मोर्चा

### ठाकरे बंधूंच्या मोर्चावर भाजपा आमदाराची कवितेतून खोचक टीका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मुंबई**

पहिलीपासून हिंदीसक्ती करण्याचा शासन निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रद्द केल्यानंतर शिवसेना (ठाकरे) आणि मनसेकडून ५ जुलै रोजी काढण्यात येणारा मोर्चा रद्द करण्यात आला. मात्र मोर्चाऐवजी आता विजयी मेळावा घेतला जाणार आहे. मुंबईच्या वरळी डोम येथे होणाऱ्या विजयी सभेवर भाजपाचे आमदार डॉ. परिणय फुके यांनी कवितेमधून खोचक टीका केली आहे. विधानपरिषदेत बोलत असताना त्यांनी कवितेमधून मोर्चावर टीका केली.



डॉ. परिणय फुके म्हणाले की, उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांच्या काळात त्रिभाषा सूत्र स्वीकारले गेले होते. त्यांच्या काळातील निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रद्द ठरविला, याबद्दल फडणवीस यांचे आभार मानण्यासाठी खरंतर ही सभा घ्यायला हवी. यानंतर त्यांनी एक कविता सादर करून ठाकरे बंधूंवर टीका केली.विधान परिषदेत नियम २६० अन्वये सत्ताधाऱ्यांच्या वतीने सादर करण्यात आलेल्या प्रस्तावावर डॉ. परिणय फुके बोलत होते. राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर मागच्या सहा ते सात महिन्यात महाराष्ट्राचा विकास होत असल्याचे परिणय फुके यांनी यावेळी सांगितले.

## एकनाथ शिंदेंच्या 'जय गुजरात'वर प्रतिक्रिया देताना देवेंद्र फडणवीसांनी घेतले शरद पवारांचे नाव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मुंबई**

पुण्यातील एका कार्यक्रमात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे भाषणाच्या शेवटी जय महाराष्ट्र नंतर जय गुजरात म्हणाले. या मुद्द्यावरून विरोधकांनी टीकेची झोड उठवली. पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या मुद्द्यावर शिंदे यांची पाठराखण केली. तसेच, राष्ट्रवादी शप गटाचे शरद पवार यांचे नाव घेत प्रतिक्रिया दिली.

कर्नाटकात चिकोडी येथे छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचे उद्घाटन करताना शरद पवार यांनी 'जय महाराष्ट्र, जय कर्नाटक' म्हणाले होते. याचा अर्थ त्यांचे कर्नाटकवर जास्त प्रेम आहे आणि महाराष्ट्रावर प्रेम नाही असे समजायचे का? आपण




ज्यांच्या कार्यक्रमात जातो त्यावेळी त्या संदर्भात आपण बोलत असतो. गुजराती समाजाच्या कार्यक्रमात एकनाथ शिंदे 'जय गुजरात' म्हणाले. त्यावरून एकनाथ शिंदे यांचे महाराष्ट्रावरील आणि मराठी माणसावरील प्रेम कमी झाले आणि गुजरात वर जास्त प्रेम आहे असा संकुचित विचार मराठी माणसाला शोभत नाही. मराठी माणूस हा वैश्विक आहे. याच मराठी माणसाने अटकेपार झेंडे लावले आणि संपूर्ण भारताला स्वतंत्र केले. दिल्लीवर भगवा झेंडा लावण्याचे काम मराठी माणसाने केले. एवढा संकुचित विचार कोणी करत असेल, तर ते चुकीचं आहे, असे मत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडले.या वक्तव्याने शिंदे यांच्या महाराष्ट्र प्रेमाबाबत कोणी शंका घेत असेल, तर ते अतिशय संकुचित विचार करत आहेत असेच मी म्हणेन, अशा शब्दांत मुख्यमंत्र्यांनी एकनाथ शिंदे यांची पाठराखण केली.

## क्या करना है बोल, राज ठाकरेंना टॅग करत मुंबईतील उद्योजकानं डिवचलं; मनसैनिकांच्या धमक्या, पोलिसात धाव

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मुंबई**

राज्यात इयत्ता पहिलीपासूनच्या हिंदी सक्तीविरोधात मनसे आक्रमकपणे मैदानात उतरल्यानंतर, तसेच राज ठाकरे यांनी भव्य मोर्चा काढण्याची घोषणा केल्यानंतर राज्य सरकार एक पाऊल मागे आलं आहे. सरकारने एक पाऊल मागे येत हिंदी व तिसरी भाषा सक्तीचा निर्णय मागे घेतला. मात्र, तरीही मनसेनं आयोजित केलेल्या मोर्चाचे रुपांतर विजयी मेळावा म्हणून करण्यात आलं आहे. या विजयी जल्लोषसाठी मनसे आणि उद्धव ठाकरेंची शिवसेना एकत्र येत आहे. ५ जून रोजी वरळीत हा सोहळा आयोजित करण्यात आला आहे. त्यातच, मनसैनिकांनी एका व्यापाऱ्याला मराठी न बोलण्यावर मारहाण केल्यावरुन इतर व्यापाऱ्यांनी संताप व्यक्त केल्याचं पाहायला मिळालं. तर, मुंबईत राहायचं असल्यास मराठी आपलं पाहिजे, अशी मनसेची भूमिका आहे. मात्र, उद्योजक आणि गुंतवणूकदार सुशील केडिया यांनी ट्विट करुन थेट राज ठाकरेंनाच डिवचलं आहे.




राज ठाकरे हे लक्षात ठेवा, मी गेल्या ३० वर्षांपासून मुंबईत राहत असूनही मला मराठी नीट येत नाही. आता, तुमच्या वाईट वागणुकीमुळे मी असा निश्चय केला आहे की, जोपर्यंत तुमच्यासारख्या लोकांना मराठी माणसांची काळजी घेण्याचे नाटक करण्याची परवानगी मिळत आहे, तोपर्यंत मी मराठी शिकणार नाही. मी अशी प्रतिज्ञा करतो. क्या करना है बोल? असा थेट सवालही सुशील केडिया यांनी थेट राज ठाकरेंना केला आहे.

मुंबईत दोन ठाकरे बंधू मराठीच्या मुद्द्यावर एकत्र येण्याच्या एक दिवस अगोदरच केडिया यांनी अशा आशयाचं ट्विट केल्यामुळे, मनसैनिकांनी संताप व्यक्त केला आहे. तसेच, मनसेच्या कार्यकर्त्यांकडून सुशील केडिया यांनी धमक्याही दिल्या जात आहेत. विशेष म्हणजे केडिया यांनी आणखी एक ट्विट केलं असून मनसेच्या कार्यकर्त्यांकडून आपणास धमक्या येत असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. तसेच, गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मुंबई पोलीस आयुक्त यांच्याकडे सुरक्षा मिळावी, अशी मागणीही केली आहे. भारताचा एक नागरिक म्हणून मला महाराष्ट्रात, मुंबईत सुरक्षित आणि मान-सन्मानाने राहण्याचा अधिकार आहे. मात्र, अशा धमक्यांमुळे यावर प्रश्न उपस्थित होत असल्याचंही सुशील केडिया यांनी ट्विटमधून म्हटलं आहे.

## संपादकीय ......

# नातवंडांना रोजगार, वयोवृद्धांना आधार

उच्चशिक्षित तरुण पिढीमधील वाढती बेरोजगारी हा जगभरातील चिंतेचा विषय असून लोकसंख्येच्या बाबतीत नंबर वन असलेला चीनही याला अपवाद राहिलेला नाही. मात्र, इथल्या तरुणाईने यावर मुलखावेगळा उपाय शोधून काढला आहे. चीनमध्ये काही दिवसांपासून पूर्णवेळ नातवंड (फुल टाईम ग्रँड चिल्ड्रन) हा आगळा-वेगळा ट्रेंड सुरू झाला असून तो मोठ्या प्रमाणात लोकप्रियही होत आहे. याअंतर्गत अनेक तरुण गावाकडे परतत असून आजी-आजोबांच्या सेवाशुश्रूषेला प्राधान्य देत आहेत. यामधून वयोवृद्धांची सेवाही होत आहे अन ज्येष्ठांच्या पेन्शनमधून या तरुणांना आर्थिक आधारही मिळत आहे.

यामध्ये २० ते ३० वयोगटातील तरुण पिढी सहभागी होत असून याअंतर्गत काहींची महिन्याची कमाई लाखाच्या घरातही जात आहे. कोव्हिड-१९ नंतर चीनमध्ये आर्थिक मंदीचा फटका बसला आहे. खासगी कंपन्यांवरील कडक नियम, रिअल इस्टेट बाजारातील संकट आणि कठोर ९ / ९/ ६ काम संस्कृती (सकाळी ९ ते रात्री ९, आठवड्यातील सहा दिवस) यामुळे अनेक तरुण नोकरीच्या संधींपासून वंचित आहेत. जून २०२३ मध्ये चीनमधील १६ ते २४ वयोगटातील शहरी तरुण बेरोजगारीचा दर २१.३ टक्के नोंदवला गेला. पण काही अंदाजानुसार हा दर प्रत्यक्षात ४६ टक्केपेक्षा जास्त असू शकतो. या पार्श्वभूमीवर अनेक तरुण आपल्या गावाकडे परतत आहेत आणि आजी-आजोबांची सेवा करून कुटुंबातील एक प्रकारचा आधार बनत आहेत. त्यामुळे त्यांना वृद्धांच्या पेन्शन किंवा कौटुंबिक बचतीतून थोडाफार आर्थिक आधार मिळत आहे.

कौटुंबिक नात्यांना नवे आयाम देणार्या चीनमध्ये फिलियल पायटी म्हणजेच वडीलधार्यांची काळजी घेणे ही परंपरा मानली जाते. २०२० च्या जनगणनेनुसार, चीनमध्ये ६० वर्षांवरील २६४ दशलक्ष वृद्ध आहेत. अनेक वृद्धांना एकटेपणा जाणवतो. त्यामुळे नातवंडांच्या उपस्थितीने त्यांना मानसिक आधार मिळत असून तरुण पिढीसाठीही हा अनुभव फायदेशीर ठरत आहे. २४ वर्षीय शियाओलिन सांगते, आजी-आजोबांसोबत घालवलेला प्रत्येक दिवस अमूल्य आहे. मात्र, या ट्रेंडवर टीकाही होत आहे.

ग्रामीण भागातील अत्यल्प पेन्शनमुळे ही जबाबदारी दोघांसाठीही आर्थिक अडचणी निर्माण करू शकते. मोठ्या आर्थिक आणि सामाजिक परिणामांची झलक दाखवणारा हा ट्रेंड चीनमधील बेरोजगारी, कुटुंबसंरचनेतील बदलाचा द्योतक मानला जात आहे. एक मूल धोरणामुळे कुटुंबाचा आकार लहान झाला आहे. त्यामुळे वृद्धांची जबाबदारी कमी लोकांवर पडत आहे.त्यामुळे सरकारकडून नाईट मार्केटस् आणि ब्ल्यू कॉलर नोकर्यांना प्रोत्साहन देण्याचे प्रयत्न सुरू आहेत. चिनी सोशल मीडियावरील गाजावाजामुळे जगभरात पूर्णवेळ नातवंड हा विषय चर्चेत आला आहे. काहीजण याला प्रेमाचा, तर काहीजण आर्थिक मजबुरीचा पर्याय मानतात. पण, यातून चीनमधील बदलती तरुणाई आणि कौटुंबिक जिव्हाळा अधोरेखित होत आहे हे मात्र नक्की!

# फळपीक विमा योजनेसाठी ६ जुलैपर्यंत नोंदणीची संधी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती-** अमरावती जिल्ह्यातील फळ उत्पादक शेतकऱ्यांना पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजना मृग बहार २०२५-२६ अंतर्गत अर्ज करण्याची अंतिम मुदत ६ जुलै २०२५ पर्यंत आहे. नैसर्गिक आपत्ती, कीड किंवा रोगांमुळे फळपिकांचे होणारे मोठे नुकसान टाळण्यासाठी ही योजना शेतकऱ्यांसाठी संजीवनी ठरणार आहे. जिल्ह्यासाठी भारतीय विमा कंपनीची निवड झाली असून, राज्य शासनाने या योजनेस दोन वर्षांसाठी (२०२४-२५ आणि २०२५-२६) मान्यता दिली आहे.

या योजनेमुळे शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य टिकून राहील आणि त्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान वापरण्यास प्रोत्साहन मिळेल. संत्रा, मोसंबी, लिंबू, पेरू, डाळिंब आणि सीताफळ या अधिसूचित फळपिकांसाठी ही योजना लागू आहे. योजनेत



सहभागी होण्यासाठी शेतकरी ओळखपत्र क्रमांक (□GRIST□CK Farmer ID) आणि ई-पीक पाहणीमध्ये नोंदणी अनिवार्य आहे.

पेरू, लिंबू, संत्रा, मोसंबीसाठी आधार संकेतस्थळावरील तांत्रिक अडचणींमुळे ३ ते ६ जुलै २०२५ अशी ४ दिवसांची विशेष मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे, इच्छुक शेतकऱ्यांनी आपल्या नजीकच्या बँक शाखेत किंवा आपले सरकार सेवा केंद्रावर जाऊन विहित मुदतीत विमा हप्ता भरून योजनेत सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, अमरावती यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी तालुका किंवा जिल्हा कृषी कार्यालयांशी संपर्क साधावा.

# कारमधून देशी कट्टा, चाकू जप्त, एकाला अटक; दोन जण फरार

## राजापेठच्या डीबी पथकाने केली साईनगर भागात कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती-** देशी कट्टा, चाकू बाळगून कारने फिरणाऱ्या एकाला राजापेठ पोलिसांनी बुधवारी (दि. २) जुलैला मध्यरात्री साईनगर परिसरातून अटक केली. त्याचे दोन साथीदार मात्र पळून जाण्यात यशस्वी झाले. त्यांचा शोध सुरू आहे.

अब्दुल शफिक अब्दुल हफीज (३०, रा. बिस्मिल्लानगर, अमरावती) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव असून, न्यायालयाने त्याला ५ जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. साईनगर परिसरातील साईकृपा कॉलनीत गस्तीवर असलेल्या राजापेठच्या डीबी पथकाला एक संशयास्पद कार साई मंदिराकडे येताना दिसली. त्यामुळे पोलिसांनी या कार चालकास थांबण्याचा इशारा केला. मात्र, चालकाने वाहन न थांबवता पळून जाण्याचा प्रयत्न केला.



त्याच प्रयत्नात रस्त्याच्या कडेला असलेल्या लोखंडी खांबाला कार धडकली. त्यावर पोलिसांनी कारकडे धाव घेतली. मात्र, कारमधील दोघे मधुसूदन कॉलनीकडे पळून गेले. त्याचवेळी चालकाने कार मागे घेऊन तो साई मंदिराच्या दिशेने पळून गेला. त्यावेळी कारमधून एक कापडी पिशवी खाली पडली. त्या पिशवीतून पोलिसांना देशी कट्टा हाती लागला. दरम्यान, पोलिसांनी कारमधून पळून गेलेल्या दोघांचा पाठलाग केला. त्यावेळी त्यातील एक जण नालीमध्ये पडून असल्याचे पोलिसांना दिसून आले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेत चौकशी केली. त्यावेळी त्याने आपली ओळख अब्दुल शफिक अब्दुल हफीज (३०) अशी देत पळून गेलेल्या दोघांची नावे पोलिसांना सांगितली.

अंगझडतीत त्याच्याजवळ एक चाकू व मोबाइल आढळून आला. त्यानंतर पोलिसांनी कारमधून पडलेल्या कापडी पिशवीची पाहणी केली. त्यात देशी कट्टा आढळून आला. या प्रकरणी आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई राजापेठचे ठाणेदार पुनीत कुलट यांच्या नेतृत्वात पोलिस उपनिरीक्षक मिलिंद हिवरे, सागर सरदार, पवन तिवारी, दिनेश भिसे, संजय कडू, वकील शेख, अंकुश काळे, सूरज मेश्राम यांनी केली आहे.




# स्वरयंत्राचा अर्धांगवायू

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक**
काही काळासाठी आवाज बसणे, ही तशी सर्वसामान्य समस्या. मुळात 'समस्या' म्हणण्यासारखी ती बरेचदा त्रासदायकही नसते. काही वेळा घशामध्ये वेदना जाणवतात. परंतु, तुमचा आवाज आठवड्यांनंतर, महिन्यांनंतरही पूर्ववत झाला नसेल, तर निश्चितच ती चिंतेची बाब मानावी आणि तत्काळ वैद्यकीय सल्ला घ्यावा. कारण, हा व्होकल कॉर्ड पॅरालिसिस असू शकतो.

हा विकार एका किंवा दोन्ही स्वरपटलांवर परिणाम करू शकतो.

एकपक्षीय लकवा असल्यास एका स्वरपटलावर परिणाम होतो. यामुळे बोलण्यात अडचण येते, तसेच कधी कधी गिळण्यासही त्रास होतो.द्विपक्षीय लकवा असल्यास दोन्ही स्वरपटल अकार्यक्षम होतात आणि त्यामुळे श्वास घेणेही कठीण होऊ शकते.लक्षणे व्यक्तिपरत्वे बदलतात; पण यामध्ये मुख्यतः खालील गोष्टींचा समावेश असतो :

**आवाजात बदल :** खरखरीतपणा, कर्कश किंवा हवेच्या झुळकीसारखा आवाज येणे किंवा आवाजात लयीचा अभाव असणे.श्वास घेताना आवाज येणे : कधी कधी फुरफुरी किंवा घरघर

**मोठ्याने बोलण्यास असमर्थता :** बोलताना थकवा आणि दम लागणे, अन्न किंवा पाणी गिळताना खोकला किंवा श्वास अडकणे, खोकला देऊन घशातील स्राव काढण्यात अडचण.

**व्होकल कॉर्डचा लकवा का होतो?**- हा लकवा प्रामुख्याने रीकरंट ल्यारेन्जियल नर्व्ह या मज्जातंतूमध्ये दबाव किंवा दुखापत झाल्यामुळे होतो. ही नस गळ्यातून छातीपर्यंत जाते आणि पुन्हा वर परत येते. त्यामुळे तिच्यावर इतर शारीरिक स्थितींचा सहज परिणाम होतो.थायरॉईड ग्रंथीवरील शस्त्रक्रिया करताना ही नस दुखावली जाऊ शकते. कर्करोगजन्य किंवा साध्या गाठीही या नसेवर दबाव टाकू शकतात.



पार्किन्सन, मल्टिपल स्क्लेरोसिस सारख्या विकारांमुळेही नस बाधित होते.

**काय करता येईल?**- वैद्यकीय उपचारांमध्ये पहिल्या टप्प्यात व्हॉईस थेरपी दिली जाते. यामध्ये काही व्यायाम आणि विशिष्ट क्रिया शिकवल्या जातात, ज्या आवाजात सुधारणा करतात आणि आजूबाजूच्या स्नायूंवरचा ताण कमी करतात.थेरपीने फरक न पडल्यास स्वरपटलात विशेष पदार्थाचे इंजेक्शन दिले जाते. यामुळे कमजोर झालेल्या स्वरपटलास मजबुती मिळते.

वरील उपाय अपुरे पडतात, तेव्हा शस्त्रक्रिया करून लकवाग्रस्त स्वरपटल योग्य स्थितीत आणले जाते. सर्दी-खोकल्यानंतरच्या आवाजातील बदल काही आठवड्यांत सुधारतात. त्यामुळे प्रथम काही आठवडे विश्रांती देणे योग्य असते.

पण, जर आवाजाचा बदल तीव्र असेल किंवा अनेक आठवडे काहीही सुधारणा होत नसेल, अचानक आवाज हरवला असेल आणि स्पष्ट कारणही नसेल, तर तत्काळ कंठरोग तज्ज्ञाशी संपर्क साधा.

# सोयाबीन पिकांवर संकट; 'निंबोळी' फवारणी ठरत आहे रामबाण उपाय वाचा सविस्तर

**दि.४विदर्भ प्रजासत्ताक**
खरीप हंगामात सोयाबीनपीक अंकुरले असले तरी पावसाने दडी मारल्यामुळे किडींचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढतो आहे. अशा वेळी रासायनिक औषधांऐवजी स्वस्त, सेंद्रिय आणि पर्यावरणस्नेही ५% निंबोळी अर्काची फवारणी हा शेतकऱ्यांसाठी रामबाण ठरत आहे.खरीप हंगामात सोयाबीनची पेरणी जोरात सुरू आहे. मात्र काही भागांमध्ये पावसाने अचानक विश्रांती घेतल्यामुळे पिकांवर ताण वाढला असून, कीड व रोगांचा धोकाही वाढला आहे.

मात करण्यासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी हा एक प्रभावी आणि नैसर्गिक पर्याय ठरत आहे. कृषी विभाग व 'आत्मा' संस्थेच्या तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना यासाठी मार्गदर्शन केले आहे.(डूेलशरप झळज्ञ)

सोयाबीनची स्थिती; पाऊस थांबताच कीड-रोगांचा धोका

राज्यात जून अखेरपर्यंत मोठ्या क्षेत्रावर सोयाबीनची पेरणी झाली आहे. काही भागांत पाऊस चांगला झाल्याने पीक अंकुरले असले तरी, नंतरच्या पावसाच्या खंडामुळे कोवळ्या पिकांवर कीड व बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता वाढली आहे.

निंबोळी अर्काचा वापर; नैसर्गिक व सेंद्रिय कीड नियंत्रण उपाय

५% निंबोळी अर्क हा कीड व रोग नियंत्रणासाठी अत्यंत उपयुक्त, सेंद्रिय, आणि पर्यावरणस्नेही उपाय




आहे. यामुळे पिकांवरील अळी, थ्रिप्स, मावा, पांढरी माशी यासारख्या कीटकांचे नियंत्रण शक्य होते.

निंबोळी अर्क तयार करण्याची प्रक्रिया

५ किलो निंबोळी बारीक करून १० लिटर पाण्यात रात्रभर भिजवून ठेवा

दुसऱ्या दिवशी हे मिश्रण गाळून त्यात ९० लिटर पाणी मिसळा

त्यात २०० ग्रॅम साबणाचा चुरा घालून चांगलं ढवळा

तयार झालेलं १०० लिटर द्रावण एक एकर पिकासाठी पुरेसे ठरतं

निंबोळी अर्काचे फायदे

किडींच्या जीवनचक्रात व्यत्यय आणून प्रजनन क्षमता रोखतो

सेंद्रिय व सुरक्षित असल्याने जमिनीच्या पोतात सुधारणा

फायदेशीर सूक्ष्मजीवांचे संवर्धन


रासायनिक औषधांपेक्षा स्वस्त, सोपं आणि प्रभावी

पिकांची प्रत आणि उत्पादनक्षमतेत वाढ

सेंद्रिय कीडनाशकांचे महत्त्व

'आत्मा'चे तंत्रज्ञान व्यवस्थापक जयप्रकाश लव्हाळे यांनी सांगितलं की, रासायनिक औषधांचा अतिवापर मातीच्या गुणवत्तेला बाधा पोहोचवत आहे. त्याऐवजी निंबोळी अर्क, दशपर्णी अर्क,





शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

तंबाखू अर्क हे सेंद्रिय उपाय अधिक सुरक्षित आणि दीर्घकालीन फायदे देणारे आहेत.

दशपर्णी अर्क - रोगप्रतिबंधक क्षमता वाढवतो

* तंबाखू अर्क - पाने खाणाऱ्या किडींसाठी प्रभावी

शेतकऱ्यांसाठी सल्ला

* कोवळ्या पिकांवर कीड-रोग दिसताच ५% निंबोळी अर्काची फवारणी तात्काळ करावी

* फवारणी सकाळी वा संध्याकाळी करावी

* अति पाऊस किंवा सुकाळ अशा दोन्ही स्थितींमध्ये नैसर्गिक उपाय उपयुक्त

* शेतमित्र, कृषी सहाय्यक वा 'आत्मा' केंद्राशी सल्लामसलत करून सेंद्रिय उपाय राबवावेत

निसर्गपूरक शेती आणि उत्पादनाची टिकाऊ गुणवत्ता हवी असल्यास सेंद्रिय उपाय हेच उत्तम. निंबोळी अर्कासारखे स्वस्त आणि प्रभावी उपाय सर्व शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरतील.

सोयाबीनची पेरणी अनेक भागात झाली आहे. अनेक ठिकाणी पीक अंकुरले असताना पावसाने दडी मारल्यामुळे कोवळ्या पिकास कीड रोगाचा धोका लागून आहे. अशा स्थितीत नुकसान टाळण्यासाठी निंबोळी अर्क फायदेशीर ठरू शकते. - जयप्रकाश लव्हाळे, 'आत्मा' तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक

# प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी ३१ जुलैपर्यंत मुदतवाढ

## शेतकऱ्यांना आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती,-** प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत खरीप हंगाम २०२५-२६ साठी जिल्ह्यातील शेतकरी सहभागास सुरुवात झाली आहे. नैसर्गिक आपत्ती, कीड आणि रोगांसारख्या प्रतिकूल परिस्थितीमुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण प्रदान करणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी भारतीय विमा कंपनीची निवड करण्यात आली असून, या योजनेमुळे पिकांच्या नुकसानीच्या अत्यंत कठीण परिस्थितीतही शेतकऱ्यांचे आर्थिक स्थैर्य अबाधित ठेवण्यास मदत होईल. विमा काढण्याची अंतिम मुदत ३१ जुलै २०२५ आहे. कृषी विभागामार्फत सर्व शेतकऱ्यांना आवाहन करण्यात आले आहे की, त्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी ३१ जुलैपर्यंत पिकाचा विमा काढून घ्यावा. योजनेबद्दल सविस्तर माहितीसाठी गावातील कृषी सहायक, मंडळ कृषी अधिकारी आणि तालुका स्तरावर तालुका कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा.

योजनेमुळे शेतकऱ्यांना नाविण्यपूर्ण आणि सुधारित मशागतीचे तंत्रज्ञान व सामुग्री वापरण्यास प्रोत्साहन मिळेल. कृषी क्षेत्रासाठीच्या पतपुरवठ्यात सातत्य राखणे, अन्नसुरक्षा, पिकांचे विविधिकरण आणि कृषी क्षेत्राचा गतिमान विकास व स्पर्धात्मकता वाढवणे हे या योजनेचे महत्त्वाचे हेतू आहेत. इतर व्यक्तींच्या नावाने, तसेच इतर अवैध मार्गाने विमा काढला गेल्यास तो अर्ज रद्द करण्यात येईल. योजनेत सहभागासाठी शेतकरी ओळखपत्र क्र. (□GRIST□CK Farmer ID) असणे अनिवार्य असेल आणि पीक विमा नुकसान भरपाईसाठी, ई-पिक पाहणी अंतर्गत पिकांची नोंद करणे बंधनकारक राहील. ॲग्रीस्टॅक नोंदणी क्रमांक, ७/१२, ८-अ, आधार कार्ड, बँक पासबुक, स्वयं घोषणापत्र यांचा समावेश आहे.

विविध पिकांसाठी संरक्षित रक्कम आणि विमा हप्ता (प्रति हेक्टर) खालीलप्रमाणे:

भात (तांदूळ)- विमा संरक्षित रक्कम ६१ हजार, विमा हप्ता १५२.५० रुपये, ख. ज्वारी-




विमा संरक्षित रक्कम ३२ हजार ९००, विमा हप्ता ८२.२५ रुपये, सोयाबिन- विमा संरक्षित रक्कम ५५ हजार ९००, विमा हप्ता ५५९ रुपये, मूग- विमा संरक्षित २६ हजार ६०० विमा हप्ता ५३२ रुपये, उडीद- विमा संरक्षित २५ हजार, विमा हप्ता ६२.५० रुपये, तूर विमा संरक्षित ४५ हजार ७००, विमा हप्ता ४५७ रुपये, कापूस- विमा संरक्षित ६० हजार, विमा हप्ता -७५० रुपये, मका -विमा संरक्षित ३६ हजार, विमा हप्ता ९० रुपये.

सी. एस .सी केंद्रामार्फत अर्ज करण्यासाठी शेतकरी हिस्सा रक्कम प्रति हेक्टर या पेक्षा अतिरिक्त पैसे घेतल्यास शेतकऱ्यांनी कृषि विभाग, तहसिल कार्यालयास तक्रार करावी. जिल्हा कृषि अधिकारी कार्यालय यांच्याशी संपर्क साधावा व तशी तक्रार नोंदवावी. असे आवाहन केले आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर


क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. ४ जुलै २०२५ शहर/ग्रामिण


# शिक्षण संस्थाचालकाच्या घरावर दरोडा

## दाम्पत्याला बांधून ठेवले, २० लाखांचा ऐवज लुटला



**विदर्भ प्रजासत्ताक दि.४परतवाडा**

शहरातील नामांकित शिक्षणसंस्था चालक जानराव डहाके यांच्या राहत्या घरावर मध्यरात्रीच्या सुमारास दरोडेखोरांनी दरोडा घातला. चाकूचा धाक दाखवत जबर हल्ला करत १५ ते २० लाख रुपयांच्या मौल्यवान वस्तू आणि रोकड लुटून नेल्याची खळबळजनक घटना घडली आहे. ही घटना नारायणपूर मार्गावरील चंद्रकांता नगर येथेगुरूवारी पहाटे २.३० वाजता घडली.प्राप्त माहितीनुसार, ४ ते ५ अज्ञात दरोडेखोरांनी बुधवारी मध्यरात्री डहाके यांच्या घरात जबरदस्तीने प्रवेश केला. घरात शिरताच त्यांनी जानराव डहाके यांच्यावर चाकूने हल्ला चढवून त्यांचे हात-पाय बांधले. त्यानंतर त्यांच्या पत्नीलाही बांधून ठेवत संपूर्ण घरात उधळापात केली.घरातील चार खोल्यांमध्ये ठेवलेली वस्त्रे,कपाटे, ड्रॉवर सर्व उघडून दरोडेखोरांनी सुमारे ९ लाख रुपयांची रोकड, सोनं-चांदीचे दागिने, मोबाइल फोन व इतर मौल्यवान वस्तू लुटून नेल्या. घरात दरोडेखोरांचा तब्बल ३० ते ३५ मिनिटे हैदोस सुरू होता. दरोडेखोर निघून गेल्यानंतर जानराव डहाके यांनी स्वतःला मुक्त करत पोलिसांना माहिती दिली. परतवाडा पोलीस स्टेशनचे अधिकारी, गुन्हे शाखा, आणि श्वान पथक घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनीपंचनामा करत सीसीटीव्ही फुटेज आणि परिसरातील मोबाइल नेटवर्क्सचा मागोवा घेत तपास सुरू केला आहे.

### स्थानिक आरोपींवर संशय

दरोडेखोर २० ते २५ वयोगटातील असून ते मराठी भाषेत बोलत असल्याने पोलिसांनी स्थानिक आरोपींवर संशय व्यक्त केला आहे. मात्र, अद्याप कोणतीही अटक झाली नाही.

# अमरावती शहरात ड्रग्स व अंमली पदार्थ विरोधी कडक धोरण अवलंबिले नाही तर अमरावती नशेच्या गर्तेत जाईल

## पावसाळी अधिवेशनात आ.संजय खोडके यांनी लक्षवेधी मांडून व्यक्त केली चिंता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४मुंबई/अमरावती**

राज्यात होत असलेल्या ड्रग्स व अंमली पदार्थाच्या विरोधात शासनाने कठोर धोरण अवलंबिले असून कारवायांबाबत प्रत्येक ठिकाणी स्वतंत्र युनिट कार्यान्वित करण्यात आले असल्याची घोषणा राज्याचे मुख्यमंत्री ना. देवेन्द्रजी फडणवीस यांनी राज्यविधि मंडळाच्या पावसाळी अधिवेशना तील चर्चेदरम्यान केली होती. याचे पडसाद आज गुरुवार दिनांक ०३ जुलै रोजी विधान परिषदेच्या सभागृहातही उमटले असता आ.संजय खोडके यांनी अमरावती शहरात ड्रग्स व अंमली पदार्थाची मोठ्या प्रमाणावर तस्करी होत असून यामध्ये मोठे रॅकेट सक्रिय असल्याचे सांगितले. इतकेच नाहीतर अमरावतीसारख्या लहान शहरामध्ये मादक पदार्थांच्या तस्करीच्या केसेस वाढत असल्याने त्यांना पोलीस विभागाकडूनच वरदहस्त मिळत आहेका ? असा संशय व्यक्त करीत गृहविभागाने यावर कठोर पाऊले उचलून उपाययोजना करण्याची लक्षवेधी सूचना आ. संजय खोडके यांनी केली.

अधिवेशनात बोलत असतांना आ.संजय खोडके म्हणाले कि, अमरावती शहरामध्ये एकाच वर्षात ड्रग्स व मादक पदार्थ तस्करीचे ३१ प्रकरणं समोर आली आहेत. आणि तेही जास्तीत जास्त प्रकरणं हे एकाच पोलीस स्टेशन अंतर्गत घडत आहे. म्हणजेच याचा अर्थ एकदा अंमली पदार्थांनी विक्री करणारा माणूस कार्यवाही होऊन देखील पुन्हा पुन्हा तोच धंदा करत आहे. यात एक साखळी निर्माण झाली असून आता अंमली पदार्थ आणण्यासाठी मूळ अड्ड्यावर जाण्याची गरज नसून काही अल्पवयीन मुळे थेट घरपोच अथवा हॉटेल्स व महाविद्यालया पर्यंत अंमली पदार्थ पोहोचवित आहे.



यामध्ये पोलीस कारवाईत ५० ग्रॅमच्या वर ड्रग्स बाळगली तर त्याप्रकरणात लगेच जामीन मंजूर होते. त्यामुळे अशा प्रकारावर कुणाचाही अंकुश राहिला नाही. अमरावती शहर लहान आहे. त्यामुळे कुठे काय सुरु आहे. व त्यात कोण सहभागी आहे , हेसुद्धा पोलिसांचे खुफिया व बिट जमादार यांना सर्वांना माहित असतांना याकडे डोळेझाकपणा व दुर्लक्ष केलं जात असल्याने अमरावती शहरात वाढत्या ड्रग्स व मादक पदार्थ तस्करीमध्ये पोलिसांकडूनच अभय दिला जात असल्याची सारशंका सुद्धा उपस्थित केली जात आहे. त्यामुळे हे असेच सुरु राहिले तर अमरावती शहर हे नशेचा गर्तेत गेल्या शिवाय राहणार नाही व नवी पिढी बर्बाद होईल, अशी चिंता आ. संजय खोडके यांनी सभागृहात लक्षवेधी मांडतांना व्यक्त केली. तसेच यावर अंकुश लावण्यासाठी कडक धोरण अवलंबिण्यात यावे व अमरावती पोलीस आयुक्तांना याबाबतीत सूचना देण्यात यावी अशी मागणी सभागृहासमक्ष केली.



यावर उत्तर देतांना राज्याचे मुखमंत्री तथा गृहमंत्री ना. देवेन्द्रजी फडणवीस म्हणले कि अमरावती शहरातील ड्रग्स व मादक पदार्थ तस्करीच्या वाढत्या प्रकरणात आपण स्वतः अमरावती पोलीस आयुक्तांशी चर्चा करून त्यांना या विरोधात कठोर धोरण अवलंबण्याचे निर्देशित करू. तसेच अल्पवयीनांचा सहभाग असल्यास त्यांच्या संबंध कुणाशी लागला त्यालाही दोषी धरून कार्यवाही करण्यात येईल असे मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले. तसेच ड्रग्स व मादक पदार्थाबाबत एनडीपीएस अधिनियमांतर्गत कारवाई करतांना कमर्शियल क्वान्टिटी संदर्भातही केंद्र शासनाकडे पाठपुरावा सुरु आहे. ज्यामध्ये कारवाईतील ड्रग्सचे प्रमाण जे मोठे आहे ते कमी करता यावे , म्हणजेच छोट्या प्रमाणात ड्रग्स व मादक पदार्थ बाळगण्याला कमी प्रमाणात समजून ते विक्रीच्या संदर्भात बाळगले असे गृहीत धरून शिक्षेस पात्र राहणार आहे. या दिशेने सुद्धा गृह खात्याचे प्रयत्न असल्याचे उत्तर नामदार देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

# मुलींचे चोरून व्हिडिओ काढणारी टोळी गजाआड

## बांबू गार्डनमधील प्रकार , अश्लिल हावभावाचे काढले व्हिडिओ



**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती–** वडाळी येथील बांबू गार्डनमध्ये फिरायला आलेल्या मुलींसोबत अश्लिल हावभाव करून त्यांचे व्हिडीओ काढत ते इंस्टाग्रामवर पोस्ट करणाऱ्या चार जणांच्या टोळीला फ्रेजरपुरा पोलिसांनी अटक केली. शेख फैजान शेख कादर (वय १९, रा. ताजनगर), शेख साकीब उर्फ सोनू शेख याकुब (वय २०, रा. अलिमनगर), मुदत्सीर खान अनिस खान (वय २०, रा. ताजनगर), जय संतोष सरसे (वय २१) आणि आयुष राजेश किल्लेकर (वय २१, दोन्ही रा. चपराशीपुरा) अशी अटकेतील युवकांची नावे आहेत. वडाळी येथील बांबू गार्डनमध्ये शहरातील नागरिक कुटूंबासहडब्बा पार्टी करायला जातात. तसेच मित्र-मैत्रींनीसुध्दा फिरायला येतात. परंतु बांबू गार्डनमध्ये काही टवाळखोर युवक हे मुलींची छेडखानी करण्याकरिता येतात आणि मुलींना त्रास देतात. मोबाईलमध्ये मुर्तीचे व्हिडीओ काढतात. त्यामुळे बांबू गार्डनकडे शहरातील नागरिकांनी पाठ फिरविली आहे. २९ जून रोजी काही मुली बांबू गार्डनमध्ये फिरायला गेल्या होत्या. तेव्हा संबंधित युवक है मुलींना पाहून अश्लिल हावभाव करीत होते आणि चोरून मोबाईलमध्ये त्यांचे व्हिडीओ काढून इंस्टाग्रामवर पोस्ट करीत होते. दरम्यान मुलींच्या नातेवाईकां च्या पाहण्यात संबंधित व्हिडीओ आला. त्यांनी मुलींकडे याबाबत चौकशी केली. तेव्हा त्यांनी घडलेला प्रकार आई-वडिलांना सांगितला. आई-वडिलांनी फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात तक्रार दिली. घटनेची गंभीरता पाहता फ्रेजरपुरा पोलिसांनी व्हिडीओ काढणाऱ्या युवकांचा शोध सुरु केला. दरम्यान पोलिसांना एका दुचाकीचा नंबर मिळाला. संबंधित युवकाला ताब्यात घेऊन विचारपुसकेली. त्याने चार साथीदारांची नावे सांगितली. पोलिसांनी सर्वांना अटक करून केली, त्यांनी घटनेची कबुली दिली.या कारवाईत ठाणेदार रोशन शिरसाट, पोलीस निरीक्षक निलेश गावंडे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक राहुल महाजन, पोलीस अंमलदार योगेश श्रीवास, हरीश चौधरी, सुरज यादव, रोशन वह्हाडे, जयेश परिवाले आणि अमोल राठोड यांचा समावेश होता.–

## अधिकारी, कर्मचारी रंगले सेवापूर्ती सोहळ्यात; इर्विनमध्ये घेतला अखेरचा श्वास

# कारला येथील आश्रमशाळेच्या विद्यार्थिनीचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अंजनगाव सुर्जी**

धारणी प्रकल्प कार्यालय अंतर्गत तालुक्यात कारला येथील अनुदानित आश्रम शाळेच्या सिकलसेल आजाग्रस्त विद्यार्थिनीचा अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. अनिता रामसिंग बिबेकर, असे मृतविद्यार्थीनीचे नाव आहे. ती कारला येथील अनुदानित आश्रम शाळेची इयत्ता दहावीची बिद्यार्थीनी होती. तिचा बुधवारी (ता. दोन जुलै) अमरावती जिल्हा सामान्य रुग्णालयात (इर्विन) उपचारादरम्यान दुर्दैवी मृत्यू झाला. मिळालेल्या माहितीनुसार, अनिता ही सिकलसेल पॉझिटिव्ह होती,तिची तब्बेत बिघडल्यानंतर तिला अमरावती येथील इर्विन दवाखान्यात उपचाराकरिता दाखल करण्यात आले होते मात्र उपचारादरम्यान तिची प्राणज्योत मालवली. तिचा मृतदेह कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आला. अनीता ही मुळची शेंबा (ता. संग्रामपूर, जि. बुलढाणा) येथील रहीवासी होती. घटनेची माहिती मिळताच धारणी प्रकल्प अधिकारी कार्यालयाचे प्रतिनिधी म्हणून सहायक प्रकल्प शिक्षण अधिकारी जवाहर गाढवे हे इर्विन दवाखान्यात पोहोचले.




### सानुग्रह अनुदानाचे आश्वासन

अनीता बिबेकर हिला कारला आश्रम शाळा संस्थेकडून एक लक्ष् रुपये आणि आदिवासी विभागाच्या प्रकल्प कार्यालयामार्फत एक लाख रुपये सानुग्रह निधी दिला जाणार असल्याचे आश्वासन विभागाकडून मृत अश्विनीच्या पालकांना देण्यात आले आहे.

### तर कदाचित वाचला असता जीव्

शासकिय माध्यमिक आश्रम शाळा किन्हीराजा (ता. मालेगाव, जि. वाशीम) येथील माध्यमिक मुख्याध्यापक संगीतराव गोतमारे यांच्या सेवापूर्ती सोहळ्याला अमरावती आदिवासी विभागातील बहुतांश अधिकारी, कर्मचारी उपस्थित झाले होते. त्याऐवजी अनिताच्या नाजुक परीस्थितीची दखल घेऊन तिला उपचाराकरिता नागपूर किंवा इतरत्र ठिकाणी दाखल केले गेले असते तर तिचा जीव कदाचीत वाचला असता; मात्र आदिवासी विभागाचा बेजबाबदारपणा म्हणा किंवा अनिताचे दुर्देव, तिला जीव गमवावा लागला.

# बाल गुन्हेगार पोसणाऱ्यांवर होणार कठोर कारवाई

## पोलीस उपायुक्त श्याम घुगे यांनी स्वीकारला झोन-२ चा पदभार

**विदर्भ प्रजासत्ताकदि.७अमरावती**

शहरातील कायदा व सुव्यवस्था सुरळीत ठेवण्यासोबतच बाल गुन्हेगार पोसणाऱ्यांची नावे उघड करून त्यांच्याविरूध्द कठोर कारवाई करण्यात येईल. तसेच मालमत्तेविरुध्दचे गुन्हे थांबविणे आणि मालमत्तेचे घडलेले गुन्हे उघड करण्यासाठी प्राधान्याने करणार प्रयत्न असल्याने नव्याने रुजू झालेले पोलीस उपायुक्त श्याम घुगे यांनी सांगितले.शहराचे नवे पोलीस उपायुक्त घुगे हे बुधवारी रुजू झाले. त्यानंतर आयुक्त पोलीस अरविंद चावरिया यांनी त्यांच्याकडेझोन-२ ची जबाबदारी दिली आहे. झोन २ मध्ये राजापेठ, कोतवाली, खोलापुरी गेट आणि भातकुली या चार पोलीस ठाण्यांचा समावेश आहे आणि शहरातील मुख्य बाजारपेठ याच झोनमध्ये आहे. तसेच बाल गुन्हेगारांच्या टोळ्यासुध्दा झोन-२ मध्ये असल्यामुळे परिसरातील गुन्हेगारांची माहिती घेतली जाईल. त्यानंतर बाल गुन्हेगार व त्यांना पोसणाऱ्या गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्यात येईल. तसेच मालमत्तेविरुध्दचे गुन्हे थांबविण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येणार असल्याचे डिसीपी घुगे यांनी सांगितले. श्याम घुगे हे २००५ च्या तुकडीचे पोलीस उपअधीक्षक आहेत. त्यांचा परिविक्षाधीन कालावधी सोलापूर ग्रामीणमध्ये झाला. त्यानंतर त्यांची पहिली पोस्टींग गडचिरोली जिल्ह्यात एसडीपीओ कुरखेडा येथे झाली. त्यानंतर अहिल्यानगर शहरात डीवायएसपी म्हणून त्यांनी कार्यभार सांभाळला. २०१४ मध्ये अपर पोलीस अधीक्षक म्हणून त्यांची पदोन्नतीने बदली भोकर येथे झाली. भोकरवरुन नाशिक महाराष्ट्र पोलीस प्रशिक्षण अकादमी, खामगाव अपर पोलीस अधीक्षक, तेथून अमरावती ग्रामीणला अपर पोलीस अधीक्षक राहिले. त्यानंतर मुंबई शहर येथे डिसीपी म्हणून चार वर्ष राहिले आणि परत मुंबईतून अमरावती शहर येथे डिसीपी म्हणून रुजू झाले आहेत. अमरावती ग्रामीणला अपर पोलीस अधीक्षक म्हणून काम केले आहे, मात्र शहरातील कामाचा पहिल्यांदा अनुभव आहे, असे डिसीपी घुगे यांनी सांगितले.–

# गावी जाताय ना, प्रवासादरम्यान बसमधून सीडबॉल्स फेकत जा!

## वृक्षारोपणासाठी कृषिदूतांचा प्रवाशांना संदेश, १० हजार सीडबॉल निर्मिती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४तिवसा–** पर्यावरणाला जपण्यासाठी वृक्षारोपण व त्यांचे संवर्धन अतिशय महत्वाचे असून, ही बाब लक्षात घेता येणाऱ्या काळात वृक्षारोपण व्हावे, यासाठी तिवसा येथील आर. जी. देशमुख कृषी महाविद्यालयाच्या सातव्या सत्राच्या कृषिदूतांनी तब्बल १० हजार सीडबॉलची निर्मिती करून वृक्षारोपणाला चालना देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. हे सीडबॉल्स बनवून बसने प्रवास करणाऱ्या लोकांना गावी जाताय ना मग जा. पण, बसमधून सीडबॉल फेकत जा, असा संदेश कृषिदूतांनी नागरिकांना दिला. बस स्थानकावरील प्रवाशांच्या हाती सीडबॉल्स देण्यात आले. हे सीडबॉल्स नागरिक माळरान, रिकामी मैदाने, रस्त्याच्या कडेला, एसटी बस आडवळणाला थांबली की त्या ठिकाणी फेकत आहेत. त्यामुळे सीडबॉल्समधील बीज ते जेथे फेकले तेथे मुरून रोपटे उगवणार आहे. त्यामुळे ही वसुंधरा आणखीनच हिरवी होण्यास मदत होणार आहे. नागरिकांच्या हस्ते ठिकठिकाणी सीडबॉल्स फेकले जात असून, यामुळे वृक्षारोपणाचा एक सुंदर उपक्रम कृषिदूतांनी तिवसा तालुक्यात राबवला.

या उपक्रमात तिवसा तालुक्यातील विविध गावातील नागरिकांचा मोठा संख्येने सहभाग राहिला आहे. या उपक्रमात सहभागी होण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी १० हजार सीडबॉल्सची निर्मिती केली. या सीडबॉल्सच्या निर्मितीसाठी माती, शेण, कंपोस्ट आणि कडूनिंब, चिंच, जांभूळ या वृक्षांच्या बियांचा उपयोग करण्यात आला. विद्यार्थ्यांनी विविध स्थळांसह बसस्टॉपहून प्रवास करणाऱ्या नागरिकांना पाच-पाच सीडबॉल्स देऊन त्यांना ते कुठे फेकायचे. यामुळे तुम्ही वृक्षारोपणाला कसा हातभार लावू शकता, याबद्दल माहितीही दिली. अशाप्रकारे गावातील नागरिकही या उपक्रमात सहभागी झाले



आहेत. या उपक्रमामुळे किमान ५० टक्के बीज जमिनीत रुजले तरीही या विद्यार्थ्यांनी राबवलेला उपक्रम निसर्गासाठी वरदान ठरणार आहे, एवढे निश्चित. हा उपक्रम प्राचार्य अरुण डहाके तसेच कार्यक्रम समन्वयक प्रा. सावंत राठी, सहायक प्रा. मनोज लुंगे यांच्या मार्गदर्शनात राबवण्यात आला. या उपक्रमासाठी विद्यार्थी वैष्णवी बेहरे, प्राची नांदेकर, पूर्वा ठवकर, समीर जिभकाटे, तुषार रेवतकर यांनी परिश्रम घेतले. बीज गोळा करण्यासाठी तसेच त्यापासून सीडबॉल्सच्या निर्मितीसाठी या सर्वांनी विशेष परिश्रम घेतले. यासाठी माती, शेण, कंपोस्ट खतही मिळवावे लागते. वेळ द्यावा लागतो. तसेच सीड बॉल्स तयार करून त्यांचे वितरणही करावे लागते, अशी माहिती विद्यार्थ्यांनी दिली.

# पावसाळी अधिवेशनात तालिका सभाअध्यक्ष म्हणून आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी सांभाळले कामकाज

## सभागृह चालवितांना संसदीय अनुभव , शिस्त , संयम व सद्विवेक बुद्धीचा देखील घडवून दिला प्रत्यय

### अमरावतीकरांचे हृदय अभिमानाने भारावले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४मुंबई–** राज्यविधी मंडळाच्या पावसाळी अधिवेशन २०२५ ला ३० जुनपासून मुंबई येथे सुरुवात झाली आहे. पहिल्याच दिवशी विधानसभेचे अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर यांनी विधानसभेच्या तालिका सभाअध्यक्ष म्हणून जेष्ठ विधानसभा सदस्य आ.सौ. सुलभाताई संजय खोडके यांच्या नावाची घोषणा केली. अशातच आजच्या दिनांक ०३ जुलै २०२५ रोजीच्या कामकाजादरम्यान विद्यमान अध्यक्षाच्या अनुपस्थितीत आ. सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी विधानसभेचे तालिका सभाध्यक्ष म्हणून कामकाज पाहिले व सभागृह यशस्वीरित्या चालविले.

महाराष्ट्र विधानसभेत नियम २९३ नुसार महत्त्वाच्या सार्वजनिक मुद्द्यांवर चर्चेचा प्रस्ताव मांडण्यात आला. यावेळी सभागृहातील सदस्यांनी शेतकरी विकासाबरोबरच सुखी, समृद्ध, प्रगत, पुरोगामी, सुधारणावादी महाराष्ट्र घडवण्यासाठीच्या विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. हि चर्चा अत्यंत महत्वपूर्ण असतांना तालिका सभाध्यक्ष



म्हणून विराजमान आ. सुलभाताई खोडके यांनी चांगल्या तऱ्हेने सभागृह चालविले. त्यांनी नियोजित वेळेत प्रत्येक सदस्यांना बोलण्याची संधी दिली. तसेच सत्ताधारी सदस्यांबरोबरच विरोधी बाकावर बसलेल्या आमदारांचे सुद्धा म्हणणे ऐकून घेतले.सभागृहाचे कामकाज चालवीत असतांना तालिका सभाध्यक्ष आ. सुलभाताई खोडके यांनी आपल्या प्रदीर्घ संसदीय कामकाजाचा परिचय देऊन अनुभव , शिस्त , संयम व सद्विवेक बुद्धीचा देखील प्रत्यय घडवून दिला. अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई खोडके या विधानसभेत पीठासीन तालिका सभाध्यक्ष म्हणून विराजित होताच अमरावतीकरांना मोठा अभिमान वाटला.सांगण्यात येते कि, राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात साधारणत:आठ तासांचे कामकाज चालणे अपेक्षित असते . अर्थातच आठ तास पीठासीन अध्यक्ष त्या खुर्चीवर बसून राहू शकत नाहीत. त्यामुळे अध्यक्ष अनुपस्थित असतील तेव्हा सभागृहाचे कामकाज चालविण्यासाठी तालिका अध्यक्षांचे एक पॅनल तयार करण्यात येते. या पॅनलवर महाराष्ट्र विधानसभेच्या नियम ८ पोट नियम १ अन्वये तालिका सभाध्यक्ष म्हणून आ.सौ. सुलभाताई संजय खोडके विधानसभेचे कामकाज सांभाळत आहेत. विधानसभेचे सभाअध्यक्ष अँड.राहुल नार्वेकर अनुपस्थितीत तालिका सभाअध्यक्ष म्हणून आ.सौ.सुलभाताई संजय खोडके पावसाळी अधिवेशनाचे कामकाज सांभाळत आहेत.

# महायुतीमधील महामंडळ वाटपाचा फॉर्म्युला निश्चित

## भाजप सर्वाधिक ४८% पदे, शिवसेनेच्या वाटेला २९% तर राष्ट्रवादीच्या वाट्याला २३% पदे

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.४मुंबई–** आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची तयारी सर्वच राजकीय पक्षांनी सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर आता महायुतीमधील महामंडळ वाटपाचा फॉर्म्युला देखील निश्चित झाला आहे. त्यानुसार सर्वाधिक आमदार असलेल्या भारतीय जनता पक्षाच्या वाटेला सर्वाधिक ४८% पदे येणार आहेत. शिवसेनेच्या वाटेला २९ टक्के तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वाट्याला २३ टक्के महामंडळे येणार आहेत.

स्थानिक संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्ष पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना भर देण्यासाठी महायुतीमधील महामंडळ वाटपाचा फॉर्म्युला ठरला आहे. यासाठी महामंडळाचे अ–ब–क असे वर्गीकरण देखील करण्यात येणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यानुसार तिन्ही पक्षाच्या वाटेला येणाऱ्या महामंडळाचे वाटप केले जाणार आहे. त्यानुसार सर्वाधिक आमदार संख्या असल्यामुळे भाजपच्या वाट्याला ४८% पदे येणार आहेत. तर एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्ष हा द्वितीय क्रमांकाचा आमदार असणारा पक्ष ठरला असून त्यांच्या वाटेला २९ टक्के पदे येणार आहेत. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मात्र २३ टक्के महामंडळावर समाधान मानावे लागणार आहे.



महामंडळावर वर्णी लागण्यासाठी अनेक आमदार, माजी आमदार उत्सुक

राज्यात महायुतीचे सरकार स्थापन झाल्यापासून तिन्ही पक्षांमध्ये सत्तेच्या वाटाघाटी वरुन अनेक दिवसांपासून चर्चा सुरू आहे. सुरुवातीला मंत्रिमंडळ विस्ताराला झालेला उशीर, त्यानंतर खाते वाटपासाठी झालेला उशीर, त्यानंतर पालकमंत्री पदावरून सुरु झालेला वाद अद्याप संपलेला नाही. त्यातच आता महामंडळ वाटपाचा फॉर्म्युला ठरला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यानुसार आता महामंडळाचे वाटप केले जाणार आहे. महामंडळावर वर्णी लागण्यासाठी भाजपमधील अनेक आमदार, माजी आमदार आणि मोठे नेते – पदाधिकारी उत्सुक आहेत. त्यामुळे आता कोणाच्या वाटेला कोणते महामंडळ येते? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

लवकरात लवकर महामंडळाचे वाटप पूर्ण होईल

आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महामंडळाचे वाटप हे महत्त्वाचे मानले जाते. महामंडळाच्या माध्यमातून स्थानिक नेत्यांना, पदाधिकाऱ्यांना बळ देण्याचा प्रयत्न सत्ताधारी पक्ष करत असतो. त्यामुळे आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर लवकरात लवकर महामंडळाचे वाटप पूर्ण होईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे. त्याचा फायदा सत्ताधारी पक्षातील नेत्यांना निवडणुकीत होऊ शकतो.

# झेनिथ हॉस्पिटलमध्ये कार्डिएक रिहॅबिलिटेशन आणि फिजिओथेरपी सेंटरचे भव्य उद्घाटन

## अमरावतीतील हृदय रुग्णांसाठी नवीन आशा





**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती–** झेनिथ हॉस्पिटल, अमरावतीने एक ऐतिहासिक पाऊल उचलत अमरावतीतील पहिले कार्डिएक रिहॅबिलिटेशन आणि फिजिओथेरपी सेंटर सुरु केले आहे. ही अत्याधुनिक सुविधा अशा हृदय रुग्णांसाठी समर्पित आहे, ज्यांना बायपास सर्जरी, अँजिओप्लास्टी किंवा हार्ट अटॅकनंतर संपूर्ण आणि सुरक्षित पुनर्वसनाची गरज असते.

या सेंटरचे उद्घाटन ज्येष्ठ वैद्यकीय सल्लागार डॉ. प्रकाश राघानी यांच्या हस्ते पार पडले. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ पॅथॉलॉजिस्ट डॉ. रामावतार सोनी उपस्थित होते. या प्रसंगी डॉ. रुपेश मकोडे, डॉ. स्वप्निल कोथलकर, डॉ. संग्राम देशमुख, डॉ. सतीश डहाके, डॉ. स्वप्निल रुद्रकार, डॉ. स्वप्निल नागे, डॉ. सुमित तारेकर, डॉ. नंदकिशोर भूतडा, डॉ. गिरीश बन्सोड, डॉ. विभूती बूब यांच्या सह शहरातील अनेक ख्यातनाम डॉक्टरांनी आपली उपस्थिती नोंदवत कार्यक्रमाची शोभा वाढवली. तर माहेश्वरी समाजाचे अध्यक्ष श्री. जगदीशजी कलंत्री व सचिव श्री. सुरेशजी साबू यांचीही उपस्थिती लाभली. त्यांनी हॉस्पिटलच्या या समाजोपयोगी उपक्रमाचे कौतुक करत सांगितले की, हे सेंटर अमरावतीच्या आरोग्यसेवेला नव्या उंचीवर घेऊन जाईल.या सेंटरची संकल्पना आणि स्थापना डॉ. निरज राघानी ( इ ं ट र ० ह े ॅ श न ल कार्डियोलॉजिस्ट आणि डायरेक्टर, झेनिथ हॉस्पिटल) यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली झाली आहे, आणि याचे संचालन डॉ. दिशा सोनी (कन्सल्टंट फिजिओथेरपिस्ट आणि हेड – कार्डिएक रिहॅब युनिट) करत आहेत.

### हे सेंटर का आहे खास?

हार्ट अटॅक, अँजिओप्लास्टी, बायपास सर्जरी किंवा हार्ट फेल्युअरनंतरच्या रिकव्हरीमध्ये हे सेंटर अत्यंत उपयोगी ठरणार आहे.अनुभवी डॉक्टर आणि समर्पित फिजिओथेरपिस्टच्या टीममार्फत शारीरिक, मानसिक व भावनिक पुनर्वसन.आधुनिक तंत्रज्ञान, समुपदेशन व लाइफस्टाईल मार्गदर्शनाचा समावेश – जे रुग्णांना दीर्घकालीन आरोग्याकडे घेऊन जाईल.रुग्णांच्या कुटुंबीयांनाही आत्मविश्वास आणि मानसिक आधार मिळेल. हा उद्घाटन समारंभ एक सामाजिक आणि वैद्यकीय क्षेत्रातील ऐतिहासिक क्षण ठरला, ज्यात शहरातील मान्यवर नागरिक, डॉक्टर्स आणि मीडियाचे प्रतिनिधी मोठ्या उत्साहाने सहभागी झाले.

आजचा दिवस झेनिथ हॉस्पिटलसाठी अभिमानाचा क्षण आहे. कार्डिएक रिहॅब युनिटची सुरुवात ही केवळ एक वैद्यकीय सेवा नाही, तर एक विचार आहे – की प्रत्येक हृदय रुग्णाला एक चांगले जीवन जगण्याची संधी मिळावी. उपचार फक्त औषधांनी होत नाहीत, तर काळजी, पुनर्वसन आणि योग्य मार्गदर्शनानेही होतात.

**– डॉ. निरज राघानी**

या युनिटच्या स्थापनेमागे डॉ. दिशा सोनी यांचा अथक प्रयत्न, संशोधन आणि महिन्याभराचा परिश्रम आहे. त्यांनी असा एक स्ट्रक्चर्ड कार्डिएक रिहॅब प्रोग्राम तयार केला आहे जो वैद्यकीय प्रोटोकॉलनुसार रुग्णांची प्रगती तपासेल – आणि त्यांच्या टीमच्या सहकार्याने प्रत्येक रुग्णाला वैयक्तिक उपचार व मार्गदर्शन दिले जाईल.मी फक्त उपचार करत नाही, तर प्रत्येक रुग्णाच्या प्रवासात त्यांच्यासोबत चालते. प्रत्येक कार्डिएक रुग्णाला वैयक्तिक वेळ देणार आहे – त्यांच्या व्यायाम योजनेपासून मानसिक पाठबळापर्यंत प्रत्येक टप्प्यावर. ही फक्त नोकरी नाही, ही माझी जबाबदारी आहे.– **डॉ. दिशा सोनी**

# उद्याला झेनिथ हॉस्पिटलमध्ये मोफत गुडघ्यांच्या संधिवात तपासणी शिबिराचे आयोजन – ऑर्थोपेडिक रुग्णांसाठी सुवर्णसंधी!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती –** झेनिथ हॉस्पिटल, वालकट कंपाउंड, अमरावती येथे शनिवार, ५ जुलै रोजी सकाळी १० वाजता ते दुपारी ३ वाजेपर्यंत मोफत गुडघ्यांच्या संधिवात (ऑर्थरायटिस) तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे विशेष शिबिर १०० संधि प्रत्यारोपणाच्या यशस्वी केसेसच्या निमित्ताने आयोजित करण्यात येत आहे.



या शिबिराचे नेतृत्व करतील प्रसिद्ध संधिप्रत्यारोपण तज्ज्ञ डॉ. संग्राम देशमुख (गेळपीं ठशाश्रिरलश–ाशपीं ऋशश्रश्रीहळ, एप–सश्ररपव), जे रुग्णांची मोफत तपासणी व मार्गदर्शन करतील.



कलर बॉक्स या शिबिरात रुग्णांना मिळतील खास सुविधा:मोफत इचऊ तपासणी (हाडांची मजबुती मोजणारी तपासणी – ऑस्टिओपोरोसिसपासून बचावासाठी अत्यंत आवश्यक)

एक्स–रे व पॅथोलॉजी तपासणीवर ५०% सवलत

नोंदणी शुल्क केवळ ५०रुग्णांनी त्वरित नोंदणीसाठी खालील क्रमांकावर संपर्क साधावा: ०७२१–२५६९५९० / ८५५१८७७९४३ / ८५५१९१४९१४स्थळ: झेनिथ हॉस्पिटल, वालकट कंपाउंड, अमरावती

वेदना सहन करू नका, उपचाराकडे पाऊल टाका! या सुवर्णसंधीचा लाभ घ्या आणि आपल्या सांध्यांच्या आरोग्याची काळजी घ्या.

### या रुग्णांना होणार लाभ:

गुडघ्यांच्या सांध्यात वेदना, चालताना व उठताना त्रास, सूज, संधिवात, अँकायलॉजिंग स्पॉन्डिलायटिस, हिप ऑर्थरायटिस इत्यादी समस्या असलेल्या रुग्णांसाठी.

**सुविधा केवळ पहिल्या १०० रुग्णांसाठीच मर्यादित**

डॉ. संग्राम देशमुख यांच्यामार्फत उच्च दर्जाच्या रिप्लेसमेंट सर्जरी आता कमी खर्चात उपलब्ध होत आहे. तसेच, हृदय, मूत्रपिंड व मधुमेहग्रस्त रुग्णांसाठी देखील खास सुविधा देण्यात येणार आहे.

# भाज्यांच्या किंमती गगनाला; आवक कमी झाल्याने दुप्पट भाव

## किरकोळ बाजारात ३० रूपये पाव किंमती,



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४अमरावती–** भाजीपाला हा रोजच्या जेवणातील महत्त्वाचा घटक आहे. पावसाळ्यात भाज्या स्वस्त होतात. मात्र, यंदा कुठे दुष्काळ ते कुठे अतिवृष्टीचा परिणाम हा शेतातील पिकांवर झाला आहे. परिणामी भाजीपाल्यांची आवक घटली आहे. आवक घटल्याने भावांमध्ये १० टक्क्यांनी वाढ झाली आहे. ठोकमध्ये १०० रूपये किलो, तर किरकोळ बाजारात सर्व भाज्या ३० रुपये पाव आहेत. त्यामुळे सामान्य नागरिकांचे महिनाभराचे आर्थिक बजेट कोलमडले आहे. दरवर्षी पावसाळ्याच्या सुरुवातीला भाज्यांचे भाव वाढलेले असतात, मात्र पावसाळा सुरू झाल्यानंतर भाज्यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात घेतले जाते. साधारणत: जूनअखेर आणि जुलैच्या पंधरवड्यात भाज्यांचे भाव पुन्हा स्थिर होतात. मात्र यंदा लहरी पावसाचा फटका बसल्याने मुख्य बाजारपेठेत येणाऱ्या भाज्यांची आवक घटली आहे. परिणामी भाववाढ झाली. या भाववाढीमुळे घरातील गृहिणीच्या खर्चातही वाढ झाली आहे, तसेच डब्याला भाजी कुठली करायची? या प्रश्नात गृहिणी अडकलेल्या आहेत. आठवड्याचा भाजीपाल्याचा खर्च ३५० ते ४०० च्या घरात पोहोचला आहे. भाजी मार्केटमध्ये स्थानिक भागांसह जवळपास च्या भागातून भाज्या दाखल होतात. अतिवृष्टीत भाज्यांचे उत्पादन घटल्याने किमान महिनाभर भाव वधारलेलेच राहतील, असा अंदाज बाजारातील घाऊक भाजी विक्रेते व्यक्त करीत आहेत.

# पिकांच्या नुकसानीची मदत तातडीने द्या

## आमदार राजेश वानखेडे यांनी उपस्थित केला औचित्याचा मुद्दा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.४तिवसा–** तिवसा विधानसभा मतदारसंघातीलवरखेड, तारखेड, उंबरखेड, धामंत्री, वऱ्हा, शिरजगाव मोझरी, शिवाणगाव, फत्तेपूर या गावांमध्ये दि.२८ ते ३१ मे दरम्यान मॉन्सूनपूर्व अतिवृष्टीने शेतमालाचे नुकसान झालेले आहे. त्या शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्यात यावी, असा औचित्याचा मुद्दा आमदार राजेश वानखडे यांनी गुरूवारी (ता. तीन) प्रश्नोत्तराच्या तासात उपस्थित केला.

शेतकऱ्यांच्या कांदा, तीळ, भुईमूग, ज्वारी व भाजीपाला पिकांचे मोठ्या । प्रमाणात नुकसान झालेले होते. त्याची प्रत्यक्ष नुकसानीची पाहणी करून महसूल व कृषी यंत्रणेमार्फत संयुक्त पंचनामे करण्याची प्रक्रिया सुरू केलेली होती. या अवकाळीच्या तडाख्यात हाता तोंडाशी आलेल्या पिकाच्या नुकसानीमुळे शेतकरी चिंताक्रांत झालेला आहे.याबाबत



मुख्यमंत्र्यांना पत्राद्वारे अवगत केलेले आहे. त्यांनी । जिल्हाधिकाऱ्यांना पंचनामे करून नुकसानीचा प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशा दिलेले होते. शेतकऱ्यांचे झालेल्या पिकांच्या नुकसानीबाबत तातडीने मदत करणे गरजेचे आहे. शासनाने तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी आमदार राजेश वानखडे यांनी अध्यक्षांमार्फत शासनाला केलेली आहे–

# गेल्या सहा महिन्यात अमरावती ग्रामीण भागात गुन्ह्यांचा स्फोट!

## खून, बलात्कार, वाहनचोरी वाढली : अपघातात कमी




| शीर्षक | सन २०२५ | सन २०२४ |
|---|---|---|
| खून | २२ | १७ |
| खुनाचा प्रयत्न | ३४ | २५ |
| दरोडा | ५ | ५ |
| घरफोडी | ९८ | ७४ |
| चोरी | ३६१ | २६४ |
| वाहनचोरी | ११६ | ९२ |
| दुखापत | ७६१ | ६४७ |



जिल्हा ग्रामीण पोलिसांच्या अखत्यारीतील ३१ पोलिस ठाण्यात पहिल्या सहा महिन्यात भारतीय न्याय संहितेअंतर्गत (बीएनएस) एकूण २३१७ गुन्हे नोंदविले गेले. त्याचवेळी सरासरी डिटेक्शन रेट चांगला आहे.

**– विशाल आनंद, पोलीस अधीक्षक**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

जिल्ह्याच्या ग्रामीण भागात गेल्या सहा महिन्यात तब्बल २३१७ गुन्हे नोंदविले गेले. गतवर्षीच्या पहिल्या सहा महिन्यांच्या तुलनेत यंदा त्यात ३६६ ने वाढ नोंदविली गेली. खून, खुनाचा प्रयत्न, जबरी चोरी, दुखापत, बलात्कार, घरफोडी, आत्महत्येस प्रवृत्त करणे, अपहरण, विश्वासघात अशा अनेक गुन्ह्यात वाढ झाली आहे. खून, खुनाचा प्रयत्न व दुखापतीच्या गुन्ह्यात झालेली वाढ चिंताजनक आहे.

चोरी, घरफोडीदेखील वाढली आहे. एसटी आगारातील चोऱ्या अर्थात एसटी बसमध्ये बसत असताना झालेले चोरीचे वाढलेले प्रकारदेखील प्रवाशांसाठी चिंतेचे कारण बनले आहेत. अलीकडे चांदूर बाजार, चांदूर रेल्वे, अंजनगाव, वरूड व मोर्शी येथील बस स्थानकातून लाखोंच्या सोन्याचांदीचे दागिने व रोख रकमेवर डल्ला मारण्यात आला आहे. सदोष मनुष्यवध, अपघात, सरकारी कर्मचाऱ्यांवरील हल्ला, विनयभंगांच्या घटना घटल्या आहेत. वाहनचोरी वाढल्याने वाहन पार्क करायचे तरी कुठे आणि चोरीपासून बचाव करण्यासाठी नेमके कुठली कुलूपे वापरावीत, असा प्रश्न वाहनधारकांना पडला आहे.

**बलात्कार वाढले; विनयभंगात घट**

गेल्या सहा महिन्यात ग्रामीण भागात बलात्काराचे ५९ एफआयआर नोंदविले गेले. गतवर्षी ती संख्या ४४ अशी होती. यंदा बलात्काराच्या घटनांत १५ ने वाढ झाली. विनयभंगाचे १३३ एफआयआर नोंदविले गेले. गतवर्षी ती संख्या १४९ होती. यंदाच्या सहा महिन्यात १२९ मुलामुलींना पळवून नेण्यात आले.

# संत्रा उत्पादक शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन

## पी. आर.पोटे पाटील कृषी महाविद्यालयाचा सहभाग

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

दि. २ जुलै रोजी सायट्रस इस्टेट चांदूर बाजार तर्फे खरपि येथे संत्रा उत्पादक शेतकर्यांन करिता प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पी.आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालय चे प्राचार्य व सेवानिवृत्त कीटकशास्त्रज्ञ डॉ. अनिल ठाकरे यांनी संत्रा पिकावरील जून- जुलै मध्ये येणार्या संभाव्य कीड,रोग आणि खत व्यवस्थापन तसेच खते,जिवाणू संवर्धने बुरशीनाशकद्वारे व्यवस्थापन कसे करावे याबाबत चर्चेद्वारा संत्रा उत्पादक शेतकर्यांना मार्गदर्शन केले तसेच त्यांना वर्षभर भेडसावणाऱ्या विविध समस्या जसे- सल काढणे, बोर्डे पेस्ट, आणि उन्हाळी




आणि पावसाळी फळगळ व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन करून त्यांच्या शंकांचे निरसन केले. सदर प्रशिक्षणाचा ४० पेक्षा जास्त संत्रा उत्पादक शेतकर्यांनी मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

प्रशिक्षणानंतर डॉ. ठाकरे यांनी बोदड, ता.चांदूर बाजार येथील संत्रा उत्पादक श्री नितेश अरूणपंत भोजने याचे संत्रा क्षेत्राला भेट दिली त्यावेळी सायट्रस सीला या कीडीचा प्रादुर्भाव कमी प्रमाणात आढळून आला परंतु फळे तडकणे आणि कडक होणे अश्या समस्या दिसून आल्या.

सायट्रस सिला व मावा या किडीचे व्यवस्थापनासाठी थायमिथोकझाम २५ थऋ६० ते ८० ग्राम किंवा डायमिथोएट ३० इ.सी. ४०० मिली किंवा डायफेणथायुरान ५० थझ ४००. ग्राम प्रति २०० लिटर पाण्यामध्ये मिसळून आळीपाळीने १० ते १५ दिवसाचे अंतराने भौगोलिक परिस्थिती नुसार योग्य पद्धतीने पूर्ण झाडावर फवारणी करावी तसेच फळे तडकणे आणि कडक झालेल्या फळांचे व्यवस्थापनासाठी ऋ-- ३ ३ ग्राम + कॅल्शियम नायट्रेट २ किलो + बोरान ३०० ग्राम प्रति २०० लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी असे आवाहन डॉ. अनिल ठाकरे यांनी केले.

तसेच संत्रा उत्पादक शेतकर्यांनी एकरि ३० पिवळ्या चिकट सापळ्या चा फेब्रुवारी ते नोव्हेंबर दरम्यान जमिनीपासून १.५ मीटर उंचीवर वापर आवर्जून करावा म्हणजे संत्रा पिकावरील सायट्रस् सिला ,मावा, फुलकीडे , काळी माशी, पांढरी माशी, फळमाशी, पाने पोखरनारी अळी, या सात कीडीचे प्रौढ अवस्थेत चांगले व्यवस्थापन करता येते अशी माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली.या कार्यक्रमाचे संचालन आणि आभारप्रदर्शन सिट्रस इस्टेटचे प्रभारी श्री प्रविण मोहोड यांनी केले.

# निरज मल्टीपर्पज को-ऑप. निधी बँकेने केली ग्राहकांची फसवणूक

## बँकेला कुलूप लावून व्यवस्थापक फरार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४नेरपिंगळाई:**

येथे दोन ते तीन वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या निरज को-ऑप. निधी या बँकेने नेरपिंगळाई परिसरातील व्यवसायिक व गरीब शेतकरी व शेतमजुरांच्या पैशाचा अपहार करून अनेकांना लाखो रुपयांनी गंडविले असून यामुळे लोकांच्या बँक प्रणालीवरच्या विश्वासाला तडा दिला.

नेरपिंगळाई येथे मागील तीन वर्षापासून गाजावाजा करून या बँकेने आपली शाखा नेरपिंगळाईमध्ये उघडली. गावातील काही संकलकांना हाताशी धरून गावातील अनेक व्यावसायिकांना आरडी जमा करायला लावली. अधिक व्याजाच्या प्रलोभनामुळे ज्याची व्यवसायावरच उपजिविका आहे, अशा लोकांनी आपले खाते उघडले व दैनदिन बचत सुरु केली. परिसरातील कर्मचारी असल्याने अनेकांनी अधिक व्याज मिळते, असे पाहून लाखोंचे फिक्स डिपॉझिटसुद्धा केले. एक महिन्यापूर्वी काही जण बँकेत पैसे मागायला गेले. तेव्हा कर्मचाऱ्यांनी पैसे नाहीत म्हणून हात वर केले.नेरपिंगळाई शाखेत लाडकी बुजरुक येथील पडोळे नामक तरुण व्यवस्थापकम्हणून काम पाहत होता. सदर व्यवस्थापकाने कार्यालयाला कुलूप लावुन पोबारा केला असून अनेक व्यावसायिक पडोळे या कर्मचाऱ्याच्या शोधात आहे. याबाबत खातेदारांनी शिरखेड पोलिसस्टेशनला तक्रार केली आहे, पण पोलिसस्टेशनने आतापर्यंत कुठलीच कारवाई केली नाही, असे खातेदारांनी सांगितले. आरडी खात्यात पैसे जमा करणारे सर्वच व्यावसायिक हे रोज कमावून उपजीविका करणारे असल्याने सर्व खातेदार हवालदिल झाले आहे. बँकेच्या कर्मचाऱ्यांवर पोलिस कारवाई व्हावी व आमचे पैसे परत मिळावे, अशी सर्व खातेदारांची मागणी आहे.

निरज मल्टीपर्पज निधी को-ऑप. बँक घोटाळा एक कोटी रुपयांच्या जवळपास असल्याकारणाने परवानगीसाठी प्रकरण गुन्हे अन्वेषण शाखा अमरावतीकडे पाठविले आहे. नंतर या प्रकरणामधे शिरखेड पो. स्टे. ला गुन्हा दाखल होईल.

**सचिन लुले**
**ठाणेदार पो स्टे.**
**शिरखेड**

# निवडणूक विषयक नियमित चालणाऱ्या इडज म्हणून कामातून राज्यातीलप्राथमिक शिक्षकांना मोकळे करा

## प्राथमिक शिक्षक समितीचे शालेय शिक्षणमंत्री,प्रधान सचिव उपसचिव तथा राज्य निवडणूक अधिकारी यांना निवेदन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

शैक्षणिक -अशैक्षणिक कामांच्या वर्गीकरणाचा शासन निर्णय दि. २३ ऑगस्ट २०२४ मधील परिशिष्ट -२ अशैक्षणिक कामे अ.क्र.२ ला अनुसरून इडज कामातून शिक्षकांना मोकळे करण्याबाबत निवेदन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती चे राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर यांनी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र,मंत्री (शालेय शिक्षण), राज्यमंत्री (शालेय शिक्षण),प्रधान सचिव (शालेय शिक्षण), आयुक्त (शिक्षण), उपसचिव (शालेय शिक्षण), मा. शिक्षण संचालक (प्राथमिक) यांनाही पाठविण्यात आले आहे.असे महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य प्रसिध्दी प्रमुख राजेश सावरकर यांनी कळविले आहे.मतदार नोंदणी व मतदार यादी पुनरिक्षण विषयक कामासाठी मागील कित्येक वर्षांपासून सातत्याने प्राथमिक शिक्षकांना नियुक्त केले जात आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांत पुरेसे शिक्षक नाहीत. ९०% पेक्षा अधिक प्राथमिक शाळांत स्वतंत्र मुख्याध्यापक नसून शिक्षकालाच मुख्याध्यापक म्हणून जबाबदारी पार पाडावी लागते, एकाच शिक्षकाकडे २-३ इयत्तांच्या अध्यापनाची जबाबदारी आहे. अशातच सतत वर्षभर नियमित चालणाऱ्या मतदार नोंदणी व मतदार यादी पुनरीक्षणाच्या कामासाठी इडज म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्राथमिक शाळांतील शिक्षकांना नियुक्त केले जात आहे.

शिक्षकांकडे अनेक प्रकारची अशैक्षणिक कामे दिल्याने दैनंदिन अध्यापन कार्यावर विपरीत परिणाम होत आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर दुष्परिणाम होत असल्याने राज्य शासनाने शासन निर्णय दि. २३ ऑगस्ट २०२४ रोजी निर्गत केला आहे. त्यातील परिशिष्ट व अशैक्षणिक कामे - (२) प्रत्यक्ष निवडणुकीच्या वेळी आवश्यक कामाव्यतिरिक्त निवडणूक विषयक नियमित चालणारी कामे करणे, इडज चे मतदार नोंदणी आणि मतदार यादी पुनरिक्षण, ओळख पत्र तपासणी, वितरण इत्यादी कामे प्रत्यक्ष निवडणूक संबंधित नाही. त्यामुळे इडज म्हणून शिक्षकांना दिले जाणारे मतदार यादी पुनरीक्षण हे प्रत्यक्ष निवडणुकीच्या वेळेचे काम नसल्याने सदर काम अशैक्षणिक स्वरूपाचे असल्याने या कामासाठीप्राथमिक शाळांतील शिक्षकांना नियुक्ती देऊ नये -अशी मागणी प्राथमिक शिक्षक समितीने राज्याचे शिलेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे,प्रधान सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी एस चोक्कलिंगम व उपसचिव तथा सह मुख्य निवडणूक अधिकारी मनोहर पारकर यांना केले आहे.

# शिरजगाव बंड ग्रामपंचायतच्या गेटवरचे वाळलेले झाड देतेय अपघातास निमंत्रण

## झाडामुळे नागरिकांमध्ये भीती, अपघाताचा धोका वाढला

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४चांदुर बाजार**

शिरजगाव बंड ग्रामपंचायतच्यामुख्य प्रवेशद्वाराजवळील धोकादायक झालेले आणि वाळलेली झाड नागरिकांसाठी चिंतेचा विषय बनले आहे. या झाडामुळे कधीही अपघात होण्याची शक्यता असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे

गेल्या काही दिवसांपासून परिसरात वादळी वाऱ्यासह पडणाऱ्या पावसामुळे अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडल्याच्या घटना घडल्या आहेत. अशातच ग्रामपंचायत मुख्य प्रवेशद्वाराजवळ पूर्णतः वाळलेले झाड अपघाताला निमंत्रण देत असून गावातील परिसरासह काही भागांमध्ये सुद्धा वाढलेली झाड उभी असून ती केव्हाही पडू शकतात. त्यामुळे नागरिकांनी घराबाहेर पडताना किवा सार्वजनिक ठिकाणी फिरताना भीती व्यक्त केली असल्याचे दिसून येत आहे.

गावातील मुख्य रस्त्याच्या कडेला ग्रामपंचायत आहे. त्यासमोरच शिवाजी विद्यालय असून या रस्त्यावरून विद्यार्थ्यांसह नागरिकांची मोठ्छा प्रमाणात रहदारी असते. शिरजगाव बड ग्रामपंचायतव्या मुख्य प्रवेशद्वाराजवळच वाळलेले झाड केव्हा उन्मळून पडले, याची शक्यता नाकारता येत नसल्याने त्यावर तत्काळ कारवाई करून पूर्णतः वाळलेले झाड काढावे, अशी मागणी



गावातील सुज्ञ नागरिकांमधून व्यक्त केली जात आहे.

या वाळलेल्या झाडामुळे शाळेतील मुलाच्या मनामध्ये तसेच नागरिकामध्येसुद्धा भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे, तसेच अनेक ठिकाणी झाडाच्या फांद्या विद्युत तारांत गुंतल्या जात असल्यामुळे परिसरातील विद्युत पुरवठा खंडित होत असल्याने वेळप्रसंगी वादळात ती तारावर पडल्यामुळे नोठा धोका निर्माण होऊ शकतो, या गंभीर समस्यावर ग्रामपंचायतने लवकरात लवकर उपाययोजना कराती, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

# जुन्या शिकस्त हॉटेलची भिंत कोसळली; सुदैवाने प्राणहानी नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अचलपूर**

बसस्थानकाकडे जाणाऱ्या मुख्य मार्गावरील जुन्या शिकस्त हॉटेलची भिंत कोसळली; मात्र सुदैवाने प्राणहानी टळली नाही.शहरातील जयस्तंभ चौक ते बसस्थानकाकडे जाणाऱ्या मार्गावरील आठवडी बाजार व्यापारी संकुल परिसरातील नझूलच्या जागेवर असलेले अतिशय जुने हॉटेल असून ते पाडण्यासाठी कुणी पुढे येत नसल्याने ते अनेक दिवसांपासून अखेरच्या घटका मोजत होते. गुरुवार आठवडी बाजार



असल्याने या दिवशी बाहेरगावाहून मोठ्या प्रमाणात नागरिक येत असतात; मात्र सुदैवाने त्या वेळी काही वाहने व नागरिक थोडक्यात बचावले आणि मोठा अनर्थ टळला.

आठवडी बाजार परिसरातील नझूलच्या जागेवर अनेकांनी अनधिकृत बांधकामे करू अतिक्रमण केले आहे. याबाबत नागरिकांनी व सामाजिक संघटनांनी वारंवार नगरपरिषदेला निवेदन देऊन अतिक्रमण हटवण्याची मागणी केली होती; मात्र नगरपरिषदेने वेळकाढूपणा करत अतिक्रमण हटवण्यासाठी ठोस कारवाई केली नाही. सदर धोकादायक शिकस्त इमारतीची भिंत अखेर नैसर्गिकरीत्या कोसळली. त्यामुळे अनेकांनी सुटकेचा निश्वास टाकला.

# दर्यापूर तहसीलची नूतन इमारत उद्घाटनाच्या प्रतीक्षेत

## सद्यस्थितीत तहसील चालत आहे अपुऱ्या जागेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४दर्यापूर**

तालुका स्तरावर तहसील कार्यालय हे नागरिकांसाठी महत्त्वाचे कार्यालय मानले जाते. अनेक शासकीय कागदपत्रांची नोंद, शेतीची नोंद तहसील दप्तरी असते. सद्यस्थितीत वर्ग अकरावी प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असल्याने विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी अनेक कागदपत्रांची जुळवाजुळक करावी लागत आहे. त्यामध्ये कास्ट सर्टिफिकेट, नॉन क्रिमिलियर, दाखला, रहिवासी उत्पन्नाचा दाखला, सातबारा, शासकीय योजना यामध्ये श्रावण बाळ योजना, संजय गांधी निराधारयोजना यासह प्रशासनाच्या संबंधित योजना या तहसील कार्यालयात राबविण्यात येत असतात. विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी कागदपत्रे




प्राथमिक स्तरावर महत्त्वाचे आहे.सद्यस्थितीत पोलिसस्टेशन असलेल्या मागील तहसीलमध्ये अतोनात गर्दा जमलेली असते. तहसील कार्यालयात अपुरी जागा असून वाहनांना ठेवण्यासाठी जागासुद्धा कमी पडत आहे.दुचाकी व मोठे वाहन हेरस्त्यावर ठेवल्यामुळे तेथील परिसरातील नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहेत. ग्रामीण भागातून वयोवृद्ध नागरिक हे पहाटेपासून सावलीच्या शोधात कामे करण्यासाठी बसलेली असतात. तर अनेकदा सर्वर डाऊ असल्याने नागरिकां वयोवृद्धांना मोठी अडचणी निर्माण होते. या सर्व बाबींचा शासनान विचार करून दर्यापूरमधील अमरावती रोडवर बांधण्यात आलेली टोलेजंग नवीन इमारत याचे रीतसर उदघाटन करून सर्वसामान्य नागरिकांना तहसील खुली करावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा रोहिणीफाउंडेशनचे अध्यक्ष किशोर ठाकूर यांनी केली आहे.

# स्पर्धा परीक्षांसाठीचे प्रशिक्षण ठप्प! सहा महिन्यांपासून प्रवेशपूर्व परीक्षेचा बट्ट्याबोळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४नागपूर**

राज्य शासनाने बार्टी, सारथी, महाज्योती, टीआरटीआय आदी संस्थांमध्ये एकसूत्रता आणण्यासाठी लागू केलेल्या समान धोरणाचा फज्जा उडाल्याचे चित्र आहे. या सर्व संस्थांकडून यूपीएससी, एमपीएससी, पोलीस भरती, आयबीपीएस परीक्षांसाठी दिल्या जाणार्या प्रशिक्षणाकरिता प्रवेशपूर्व परीक्षा घेतली जाते. याची जबाबदारी 'बार्टी'कडे आहे. मात्र, मागील सहा महिन्यांपासून ही परीक्षाच न



झाल्याने सर्वच प्रशिक्षण कार्यक्रम ठप्प पडले आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेच्या (बार्टी) धर्तीवर राज्यात छत्रपती शाहू महाराज संशोधन व प्रशिक्षण संस्था (सारथी), महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र संशोधन व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या संस्थांकडून एमपीएससी, यूपीएससी, बँकिंग, रेल्वे व इतर स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण दिले जाते. खासगी संस्थांच्या माध्यमातून दिल्या जाणार्या प्रशिक्षणासाठी प्रवेशपूर्व परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांची निवड केली जाते. समान धोरणापूर्वी बार्टी, सारथी, महाज्योती आपल्या पातळीवरच परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांची निवड करत होते. परंतु समान धोरणामुळे ही व्यवस्था संपुष्टात आली. प्रशिक्षण कार्यक्रमांची अंमलबजावणी व संनियंत्रणाची जबाबदारी 'बार्टी'चे महासंचालक सुनील वारे यांच्याकडे आहे. त्यामुळे 'बार्टी'ला सर्व संस्थांमधील विद्यार्थी निवडीसाठी परीक्षा घ्यायची आहे. विविध संस्थांनी प्रशिक्षण देणार्या संस्थांची निवडही केली आहे.

**विद्यार्थ्यांचे नुकसान**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग आणि केंद्रीय लोकसेवा आयोगाची पूर्व परीक्षा मे आणि जून महिन्यात घेतली जाते. यामुळे आता परीक्षेसाठी केवळ दहा महिने शिल्लक आहेत. तसेच अन्य सरळसेवा परीक्षांसाठीही जाहिराती येत असतात. मात्र, विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण बंद आहे.

# समृद्धी महामार्गावर भीषण अपघात

## एकाच कुटुंबातील चार जणांचा दुर्दैवी मृत्यू : एकाची प्रकृती चिंताजनक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ वाशिम**

मृद्धी महामार्गावर अपघातांचे सत्र काही केल्या थांबत नसल्याचे पुन्हा एकदा समोर आले आहे. गुरुवारी(३ जुलै) रात्री आठच्या सुमारास वाशिम जिल्ह्यातील समृद्धी महामार्गावर एक भीषण अपघात झाला, ज्यात नागपूरच्या एकाच कुटुंबातील चौघांचा मृत्यू झाला असून एक जण गंभीर जखमी झाला आहे. मृतक नागपूर जिल्ह्यातील उमरेड येथील रहिवासी आहे. हे सर्वजण पुण्याहून नागपूरला परत येत होते.मृतांची ओळख वैदही जैसवाल (२५), माधुरी जैसवाल (५२), राधेश्याम जैसवाल (६७) आणि संगीता जैसवाल (५५) अशी झाली आहे. तर गाडीचा चालक चेतन हेलगे (२५) गंभीर जखमी असून त्याच्यावर उपचार सुरु आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, जैसवाल कुटुंब पुण्यात एका कौटुंबिक कार्यक्रमासाठी गेले होते. गुरुवारी ते आपल्या कारने नागपूरकडे परत येत असताना, रात्री आठच्या सुमारास वाशिम



जिल्ह्यात त्यांच्या चालकाचा कारवरील ताबा सुटला. गाडी अनियंत्रित होत महामार्गावर धडकली. या अपघातात राधेश्याम जैसवाल यांच्यासह तिघांचा जागीच मृत्यू झाला.

अपघात इतका भीषण होता की, गाडीच्या पुढील भागाचा पूर्णपणे चुराडा झाला. घटनास्थळावरच आक्रोशाचे वातावरण निर्माण झाले होते. अपघाताची माहिती मिळताच वाशिम पोलिस तत्काळ घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी गंभीर जखमी संगीता जैसवाल आणि चालक चेतन हेलगे यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले. मात्र, उपचारादरम्यान संगीता जैसवाल यांचा मृत्यू झाला. सध्या चालक चेतन हेलगेची प्रकृती चिंताजनक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

**चालकाला डुलकी लागल्याचा संशय**

दरम्यान, पोलिसांनी अपघाताची नोंद घेत तपास सुरु केला आहे. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. गाडीचा वेग जास्त असल्याने चालकाचा ताबा सुटल्याची प्राथमिक शक्यता व्यक्त केली जात आहे. तसेच, चालकाला डुलकी आली असण्याचाही संशय व्यक्त केला जात आहे. समृद्धी महामार्गावर सातत्याने होणाऱ्या अपघातांनी पुन्हा एकदा प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वाहतुकीच्या नियमांचे काटेकोर पालन, तसेच गाड्यांची नियमित तपासणी, चालकांच्या विश्रांतीला महत्त्व देणे, यासारख्या बाबींकडे प्रशासनाचे आणि वाहनचालकांचे लक्ष असणे आवश्यक असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

# न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे मार्गी लावण्यासाठी जिल्ह्यात 'मध्यस्थीद्वारे विशेष अभियान' सुरू



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

अमरावती जिल्ह्यात न्यायालयीन प्रक्रियेवरील ताण कमी करून प्रलंबित प्रकरणांचा जलद निकाल लागावा, यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत ९० दिवसांसाठी 'राष्ट्रासाठी मध्यस्थी' ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण आणि सर्वोच्च न्यायालयाच्या मध्यस्थी व सलोखा प्रकल्प समितीने संयुक्तपणे आखलेली ही मोहीम, सरन्यायाधीश न्या. भूषण गवई आणि न्यायमूर्ती सूर्यकांत यांच्या मार्गदर्शनाखाली देशभर राबविली जात आहे.

या मोहिमेत वैवाहिक वाद प्रकरणे, अपघात दाव्यांची प्रकरणे, घरगुती हिंसाचाराची प्रकरणे, चेक बाउंस केसेस, व्यावसायिक वाद प्रकरणे, सेवा बाबी, गुन्हेगारी दंडनीय प्रकरणे (फौजदारी तडजोड प्राप्त नसणारी प्रकरणे सोडून), ग्राहक वाद प्रकरणे, कर्ज वसुलीची प्रकरणे, विभाजन प्रकरणे, निष्कासन प्रकरणे, जमीन अधिग्रहण प्रकरणे आणि इतर योग्य दिवाणी प्रकरणे मध्यस्थीद्वारे सोडविली जातील. यासाठी ४० तासांचे विशेष प्रशिक्षण घेतलेले मध्यस्थ कार्य करणार आहेत.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष सुधाकर यार्लगड्डा आणि सचिव डी.एस. वमने यांनी सर्व वकील मंडळी आणि पक्षकारांना आवाहन केले आहे की, त्यांनी आपली तडजोडप्राप्त प्रलंबित खटले, प्रकरणे या ९० दिवसांच्या विशेष मोहिमेमध्ये मिटवण्यासाठी संबंधित न्यायालयात अर्ज करावा. तसेच प्रकरणांबाबत अधिक माहितीसाठी नजीकच्या संबंधित जिल्हा किंवा तालुका न्यायालयाशी संपर्क साधावा.

# 'पावलो पंढरी वैकुंठ भुवन। धन्य आजी दिन सोनियाचा॥' गजानन महाराजांची पालखी पंढरपुरात

## तब्बल ३३ दिवसांच्या ७५० किलोमीटरच्या पायी प्रवासानंतर पंढरपूरात दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४ पंढरपूर**

'माझे जीवाची आवडी। पंढरपुरा नेईन गुढी।।' या अभंगातील भावना व श्रद्धे प्रमाणे विदर्भातील संत नगरी शेगाव ( बुलढाणा जिल्हा ) येथून तेहतीस दिवसांपूर्वी निघालेली गजानन महाराज यांची पालखी आज शुक्रवारी ४ जुलै रोजी भूतलावरील वैकुंठ म्हणून विख्यात पंढरपुरात डेरे दाखल झाली आहे .

तब्बल ३३ दिवस राज्यातील ९ जिल्ह्यातून ७५० किलोमीटर चा खडतर पायी प्रवास करून आणि अंगावर ऊन पाऊस झेलत ही पालखी श्री क्षेत्र पंढरपूर नगरीत दाखल झाली. या पालखीत धवल वस्त्रधारी ७०० वारकरी, ९ वाहन, २ अश्व, बँड पथकाचा समावेश



आहे. शेगाव येथील गजानन महाराज संस्थानाची ही पालखी पंढरपूर येथे ९ जुलै पर्यंत मुक्कामी राहणार आहे.

'पावलो पंढरी वैकुंठ भुवन। धन्य आजी दिन सोनियाचा।।' या अभंगाप्रमाणे आलेले वारकरी भरून पावल्याची भावना व्यक्त करीत असल्याचे यावेळी दिसून आले.राज्यासह देश विदेशातील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या शेगाव येथील गजानन महाराज पालखीचे आज मंगळवेढा येथील विसाव्या नंतर पंढरपूरात आगमन झाले. श्रींच्या पालखीचा परतीचा प्रवास संत नगरी शेगाव कडे १० जुलै रोजी सुरू होईल. पंढरपूर ते शेगाव हा ५५० किमी चा प्रवास आहे. असा येण्या जाण्याचा १३०० किमीचा पायी प्रवास श्रींच्या पालखीतील वारकरी भक्ती भावाने आनंदात करतात. ३० जुलै रोजी खामगाव मुक्कामी राहिल्यानंतर ३१ जुलै रोजी श्रींची पालखी संतनगरी शेगावी पोहोचणार आहे.

# राज्यात सौरकृषीपंपाच्या तक्रारी आता मोबाईल ॲपवरही नोंदविता येणार

## ५.६३ लाख शेतकऱ्यांची सोय होणार
## तीन दिवसांत होणार तक्रारींचे निवारण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.४अमरावती**

राज्यात विविध योजनांमध्ये शेतामध्ये बसविण्यात आलेल्या सौरपंपच्या नादुरुस्ती किंवा इतर तक्रारीसाठी आता शेतकऱ्यांना मोबाईल पचा वापर करता येणार आहे. या पवरून तक्रारी नोंदविता येणार आहे. या तक्रारींची तीन दिवसांत सोडवणुक केली जाणार आहे. यामुळे राज्यातील सौरकृषीपंप बसविलेल्या ५.६५ लाख शेतकऱ्यांची सोय झाली आहे.



राज्यात शेतकऱ्यांना दिवसा शेती सिंचन करता यावे यासाठी महावितरण कडून सौरकृषीपंपाची योजना हाती घेण्यात आली आहे. या योजनेमध्ये शेतकऱ्यांना सौरकृषीपंप बसवून दिला जात असून शेतातील विहीर, विंधन विहीरीवर सौरपॅनल बसवून पंप बसवून दिले जात आहे. राज्यात आता पर्यंत ५.६५ लाख शेतकऱ्यांना सौरकृषीपंप बसवून देण्यात आले आहेत. महावितरण कडून या सौर कृषीपंप संचाचा विमा उतरविण्यात आला असून शेतात बसविण्यात आलेल्या सौरकृषीपंप बसविल्यानंतर त्याची पुढील पाच वर्ष देखभाल दुरुस्तीची करण्याची जबाबदारी संबंधित पुरवठादार कंपनीवर सोपविण्यात आली आहे.

दरम्यान, राज्यात अनेक ठिकाणी वादळी वारे व इतर कारणामुळे सौरकृषीपंपाच्या पॅनलची तुटफुट होत असून काही ठिकाणी योग्य दाबाने पाणी मिळत नाही, तसेच काही ठिकाणी सौरकृषीपंप चोरीला जाण्याचे प्रकार होत आहे. या संदर्भातील शेतकऱ्यांना तक्रारी करण्यासाठी महावितरणच्या बेवसाईटवर किंवा टोलफ्री क्रमांकावर व पुरवठादार कंपनीच्या वेबसाईटवर तक्रारी नोंदविण्याची सुविधा होती. मात्र अनेक वेळा हि सुविधा शेतकऱ्यांसाठी अडचणीची ठरू लागली होती. त्यानंतर मात्र आता सौरकृषीपंपाच्या तक्रारीची मोबाईल पवर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या शिवाय कंत्राटदारांना ज्या जिल्हयात पंप बसविले त्या जिल्हयाच्या ठिकाणी सेवा केंद्र उभारणे बंधनकारक करण्यात आले असून शेतकऱ्यांच्या तक्रारीचे निवारण झाल्यानंतर त्यांना मोबाईलवर संदेश मिळणार आहे. याव महावितरणच्या मंडळ अधिक्षक अभियंत्यांची देखरेख राहणार आहे.

**महावितरणच्या पवर अशी नोंदवा तक्रार**

महावितरणचा प सुरु केल्यानंतर त्यावर सौरपंप तक्रार यावर क्लिक करून सौरकृषी पंपाबाबत तक्रार दाखल करता येईल. त्यावर शेतकऱ्यांनी सौरकृषी पंपाचा लाभार्थी क्रमांक किंवा नोंदणीकृत मोबाईल क्रमांक लिहीणे बंधनकारक आहे. त्यानंतर त्यांनी तक्रार नोंदवावी. यानंतर पुढील तीन दिवसात या तक्रारीची सोडवणुक करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

# 'एचएसआरपी' साठी तिसऱ्यांदा मुदतवाढ : १५ ऑगस्टनंतर होणार कारवाई प्रादेशिक परिवहन अधिकारी - उर्मिला पवार यांची माहिती

**अरुण जोशी**

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

राज्यात २०१९ पूर्वीच्या जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी पाटी अर्थात हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबरप्लेट म्हणजेच 'एचएसआरपी' बसवणे बंधनकारक केले आहे. यासाठी ३० जून ही अखेरची मुदत देण्यात आली होती. परंतु नंबरप्लेटचा तुटवडा आणि नोंदणीसाठी येणाऱ्या तांत्रिक अडचणीमुळे तिसऱ्यांदा १५ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. ही शेवटची मुदत असून या दिलेल्या मुदतीत नोंदणी न केलेल्या वाहनधारकांवर दंडात्मक कारवाई केली जाणार असल्याचा इशारा राज्य परिवहन विभागाने दिला आहे.परिवहन विभागाच्या




आयुक्तांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले की, राज्यातील ३० टक्के वाहनधारकांनीच नवीन नंबरप्लेट बदलली आहे. ७० टक्के वाहन धारकांची नोंदणी व्हायची आहे आणि त्यासाठी येणाऱ्या तांत्रिक अडचणी लक्षात घेता 'एचएसआरपी' नंबरप्लेटसाठी तिसऱ्यांदा मुदतवाढ १५ ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. राज्यात सध्या २ कोटींपेक्षा जास्त जुनी वाहने आहेत. यापैकी केवळ २३ लाख वाहनांवर एचएसआरपी बसवण्यात आले असून, ४० लाख वाहनधारकांनी ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण केली. त्यामुळे अद्याप जवळपास १.२५ कोटी वाहनांवर नवी नंबरप्लेट बसवणे बाकी आहे. मोठ्या प्रमाणात तांत्रिक व पुरवठा अडचणी लक्षात घेऊन ही मुदत वाढवण्यात आली आहे. यापूर्वी ३१ मार्च २०२५ पर्यंत, ३० एप्रिल आणि त्यानंतर ३० जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. जुन्या २ कोटी वाहनांपैकी फक्त २३ लाखांवर वाहनांना एचएसआरपी नंबरप्लेट बसवल्या आहेत. तसेच काही जणांना ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण करूनही प्लेट मिळालेल्या नाहीत. राज्यातील ६० प्रादेशिक - उपप्रादेशिक परिवहन कार्यालयांची तीन मंडलांत विभागणी केली आहे. तीन मंडलांसाठी मेसर्स रोजमर्टा सेफ्टी सिस्टीम लिमिटेड, मेसर्स रियल मेजॉन इंडिया लिमिटेड, मेसर्स एफ टी ए एचएसआरपी सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड अशा तीन कंपन्यांची निवड करण्यात आली आहे. एचएसआरपी नंबरप्लेट कशी असते, याची वाहनचालक व वाहनधारकांना तसेच वाहन मालकांना असलेली जिज्ञासा लक्षात घेता, याबाबतीत माहिती पुढीलप्रमाणे आहे. 'एचएसआरपी' नंबरप्लेट ही एल्यूनियमपासून बनलेली असते. तसेच क्रोमियम आधारित होलोग्राम स्टिकर आणि टॅम्पर-प्रूफ लॉकयुक्त असते. होलोग्राम खाली लेझर बँडेड १० अंकी पिन कोड असतो. यासोबतच एक सिरीयल नंबर आणि न काढता येणारा लॉक असतो.

### ही नंबर प्लेट महत्वाची

चोरी, वाहन ट्रॅकिंग आणि इतर सुरक्षा कारणांसाठी ही नंबर प्लेट महत्वाची आहे.देशातील सर्वं नवीन आणि जुन्या वाहनांसाठी 'एचएसआरपी' बसवणे अनिवार्य आहे.अशी माहिती देण्यासह अमरावती येथील प्रादेशिक परिवहन अधिकारी उर्मिला पवार यांनी विदर्भ प्रारजासत्ता बोलतांना दिली.



# तिवसा तालुक्यातील ४५ ग्रामपंचायतींमध्ये महिलांसाठी सरपंच पद आरक्षित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

तिवासा तालुक्यातील एकूण ४५ ग्रामपंचायतींमध्ये आगामी सार्वत्रिक निवडणुकांसाठी 'सरपंच' पद हे महिलांसाठी आरक्षित करण्यात आले आहे.ग्रामपंचायत अधिनियम आणि शासनाच्या अधिसूचनेनुसार, १३ जून २०२५ पासून पुढील पाच वर्षांच्या कालावधीसाठी ग्रामपंचायतींमध्ये सरपंच पद (महिलांसाठी) आरक्षित ठेवण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. या आरक्षण निश्चितीसाठी, मंगळवार, दि. ८ जुलै २०२५ रोजी दुपारी १२ वाजता तिवासा येथील तहसीलदार सभागृहात सोडत काढण्यात येणार आहे.




या सोडतीद्वारे अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नामाप्र प्रवर्गातील महिला आरक्षणासह सरपंच पदांसाठी जागा जाहीर केल्या जातील.

यावेळी सर्व ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच, सदस्य आणि नागरिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन तिवसा तहसीलदारडॉ. मंजूर कळसे यांनी केले आहे.


# जलजीवन योजनेच्या कामाला मंदगतीचा फटका

## भर पावसाळ्यात मेळघाटात पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट

**विदर्भ प्रजसत्ताक**
**दि.४मेळघाट मोथा**

मेळघाटातील हतरू परिसरातील अनेक गावांमध्ये गेल्या चार महिन्यांपासून अनियमित वीज पुरवठ्यामुळे गावकरी त्रस्त झाले असून विजेअभावी उंच टाक्यांमध्ये पाणी चढत नसल्याने भर पावसाळ्यात पिण्याच्या पाण्यासाठी गावकऱ्यांना पायपीट करावी लागत आहे. हातपंपावरून उपलब्ध होणाऱ्या पाण्यावर गावकऱ्यांना तहान भागवावी लागत आहे. त्यातच दुषित पाणी पुरवठा होण्याचा धोका वाढला आहे.तर जलजीवन योजनेची कामे संथगतीने सुरु असल्याचा फटका हि आदिवासी बांधवाना बसत आहे. या परिसरात प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र आहे. पण, वीज नाही. विजेअभावी शासकीय कामकाजावर आणि शालेय कामकाजावर देखील परिणाम होत असल्याचे गावकऱ्यांचे म्हणणे आहे.

मोथा गावातील महिलांना देखील हंडाभर पाण्यासाठी गेल्या महिन्यात पायपीट करावी लागली. गावात पाणी येत नसल्याने गावाबाहेर एक किलोमीटर अंतरावरील विहिरीतून पाणी



आणावे लागले. हर घर नल योजनेअंतर्गत प्रत्येक घरी नळाद्वारे पाणी उपलब्ध करून देण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे. चिखलदरा तालुक्यातील चुनखडी, खडीमल, बिछूखेडा, बोराट्याखेडा, रायपुर, रेट्याखेडा, माखला, सोनापुर, एकझिरा यासह अनेक गावांमध्ये उन्हाळ्यात पाण्याची टंचाई जाणवते. महिला आणि मुला-मुलींना इतर सर्व कामे बाजूला सारुन पाण्यासाठी वणवण भटकावे लागते. दूरवर कोठेतरी शेतात जाऊन पाणी आणावे लागते. त्यामुळे महिलांची मजुरी बुडते तर मुले-मुली शाळेत जाण्यापासून वंचित होतात. दुसरे असे की, घनदाट वनराजी आणि वन्यप्राण्यांचा मुक्त संचार या भागात आहे. त्यामुळे घराबाहेर पडून पाण्याच्या शोधात भटकंती करणेदेखील जोखमीचे आहे.

दुसरीकडे, मेळघाटातील २२ गावांत जलजीवन योजनेची कामे गेल्या दोन वर्षांपासून मंदगतीने सुरू असून काही गावांचे पाणी पुरवठा योजनेचे काम पूर्णत्वास जाऊनही वीज जोडणीअभावी नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागते. पाणीटंचाईमुळे स्वच्छ पाण्याची कमतरता असून दुषित पाणी प्यायल्याने जलजन्य आजार फैलावण्याचा धोका असतो. अनेक गावांमध्ये जलजीवन मिशनची कामे सुरू असतानाही तीव्र पाणी टंचाई जाणवत आहे. २०१९ मध्ये सुरू करण्यात आलेल्या या योजनेचे उद्दिष्ट २०२४ पर्यंत प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला नळाचे पाणी पुरविणे हे होते. मात्र २०२४ उलटून देखील २२ गावांमध्ये नळयोजना अस्तित्वात आलेली नाही.

# जुन्या बायपासवर चारचाकी अचानक उभ्या ट्रॅक मध्ये शिरली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.४अमरावती**

शहरात यशोदा नगर ते चपराशी पुरा जाणाऱ्या रोड वर सकाळी ८.२० मिनिटांनी फॉरेस्ट कॉलनी जवळ स्मशान भूमी आहे त्या रोड वर मोठ्या प्रमाणात फुटफाट वर ट्रॅक उभे असतात रोडच्या दोन्ही साइड ला मोठ्या प्रमाणात ट्रॅक उभे करून ठेवले आहे सकाळीच शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांची रोडवर गर्दी असते व स्कूल व्हॅन ऑटो सुद्धा शाळेत नेण्यासाठी या रोडने जात असतात रोडवर उभी असलेले हे ट्रक अपघाताला आमंत्रण देत आहे उभे असलेले ट्रक वाहतुकीला अडथळा होत आहे पण मात्र फुटपाट वरून कोणाला चालता येत नाही अशी एखादी घटना घडली तर याला उभे असलेले ट्रक मालक जबाबदार आहे त्यावर कारवाई कोण करणार शहर वाहतूक विभाग याकडे दुर्लक्ष करत असून आज सकाळी साडेआठ वाजता उभ्या ट्रकला चार चाकी बुलेरो मारुती कंपनीची जोरदार टक्कर दिली असून चालकाला कोणतीही दुखापत झाली नाही मात्र गाडीचा चुराडा झाला आहे रॉंग साईड न येत असलेल्या महिलेला वाचवण्यासाठी भरधाव वेगात असलेली कार बुलेरो यांनी उभ्या ट्रकला दिली धडक मात्र कोणालाही दुखापत नाही मात्र या रोडवर उभे असलेल्या ट्रकावर वाहतूक विभाग कारवाई करणार का हे आता पाहणं महत्त्वाचं ठरतं.